www.rajdand.com
सातारा/पुणे, रविवार
०४.02.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । माघ कृ १४
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# मी १६ नोव्हेंबरलाच राजीनामा दिला
## छगन भुजबळांचं मोठं वक्तव्य

**मुंबई :** राज्य सरकारने मराठा आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्यापासून राज्यभरातले ओबीसी नेते आक्रमक झाले आहेत. ओबीसी नेते तथा राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सातत्याने राज्य सरकारच्या निणर्याविरोधात भूमिका घेतली आहे. दरम्यान, भुजबळ यांनी आज (३ फेब्रुवारी) अहमदनगर येथे ओबीसी आरक्षण बचाव एल्गार मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात बोलताना छगन भुजबळ यांनी राज्य सरकारविरोधात दंड थोपटले, तसेच राजीनाम्याच्या मागणीवर उत्तर दिलं.



मराठा आरक्षणाच्या अध्यादेशानंतर छगन भुजबळ यांनी त्यास विरोध सुरू केला आहे. या विरोधानंतर शिवसेनेच्या शिंदे गटातील आमदार संजय गायकवाड आणि आमदार तथा शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. संजय गायकवाड यांनी छगन भुजबळ यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणी केली आहे. तसेच त्यांच्या कमरेत लाथ घालून त्यांना मंत्रिमंडळाबाहेर काढा, असं वक्तव्य केलं आहे. यावर छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

ओबीसी आरक्षण बचाव एल्गार मेळाव्यात छगन भुजबळ म्हणाले, सरकारमधले काही लोक, विरोधी पक्षातले काही नेते माझ्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. विरोधक मला म्हणतायत की, सरकारचे निर्णय पटत नाहीत तर मग राजीनामा द्या. सरकारमध्ये का राहता? सरकारवर टीका करता आणि त्याच सरकारमध्ये कसे काय राहता? हिंमत असेल तर राजीनामा द्या. काल कोणीतरी बोललं या भुजबळला लाथ घालून मंत्रिमंडळाबाहेर काढा, भुजबळच्या कमरेत लाथ घालून त्याला बाहेर हाकला. मला या सर्वांना, माझ्या विरोधकांना, स्वपक्षातील आणि स्वसरकारमधील लोकांना सांगायचं आहे की मी आधीच राजीनामा दिला आहे.

छगन भुजबळ म्हणाले, आंबड येथे १७ नोव्हेंबर रोजी ओबीसी एल्गारची पहिली रॅली झाली. त्या रॅलीच्या एक दिवस आधी, म्हणजेच १६ नोव्हेंबर रोजी मी माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. मी आधी राजीनामा दिला आणि मगच आंबडच्या सभेसाठी रवाना झालो. त्यामुळे मला लाथा घालायची गरज नाही. मी आधीच राजीनामा दिला आहे. राजीनामा देऊन मी अडीच महिने शांत राहिलो. कारण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री मला म्हणाले की याची कुठेही वाच्यता करू नका. परंतु, वतर्मानपत्रात बातमी आली, कोणी म्हणालं राजीनामा द्या, कोणी म्हणतं दिला, कोणी म्हणतं नाही दिला. कोणी म्हणतं भुजबळला लाथा घाला. मी त्या सर्वांना सांगेन की, मला लाथा घालायची काहीही गरज नाही. मी राजीनामा दिला आहे. कारण मी शेवटपर्यंत ओबीसींसाठी लढणार आहे

### राजीनामा स्वीकारलेला नाही



भुजबळांच्या या गौप्यस्फोटावर आता राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील यावर भाष्य केलं आहे. फडणवीस यांनी काही वेळापूवी गडचिरोली येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, भुजबळांच्या राजीनाम्याबद्दल केवळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सांगू शकतील. आज मी एवढंच सांगेन की आम्ही त्यांचा राजीनामा स्वीकारलेला नाही. किंवा मुख्यमंत्र्यांनीदेखील भुजबळांचा राजीनामा स्वीकारलेला नाही.

३ फेब्रुवारी रोजी जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आयोजित गडचिरोली महोत्सवाच्या निमित्ताने देवेंद्र फडणवीस आले होते. रात्री ९.३० च्या सुमारास त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी भुजबळ यांच्या राजीनाम्याबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, याबाबत मुख्यमंत्री अधिक विस्ताराने सांगू शकतील, पण मुख्यमंत्र्यांनी किंवा मी त्यांचा राजीनामा स्वीकारलेला नाही.

# शिंदेंनी माझे पैसे खाल्ले
## हे गणपत गायकवाडांचे शब्द



**उल्हासनगर :** उल्हासनगरमधील हिल पोलीस ठाण्यात शुक्रवारी (२ फेब्रुवारी) रात्री भाजपाचे कल्याण पूवर्चे आमदार गणपत गायकवाड आणि शिवसेनेच्या शिंदे गटाचे कल्याण पूर्व विभागाचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यात बाचाबाची झाली. यावेळी आमदार गणपत गायकवाड यांनी महेश गायकवाड आणि त्यांच्या समथर्कांवर गोळीबार केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात महेश गायकवाड आणि त्यांचे सहकारी गंभीर जखमी झाले असून ठाण्यातील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार चालू आहेत. या गोळीबाराच्या घटनेचे राज्यभर पडसाद उमटू लागले आहेत. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच विरोधी पक्ष सत्ताधाऱ्यांविरोधात आक्रमक झाले आहेत.

उल्हासगरमधील गोळीबाराच्या घटनेबाबत काँग्रेस नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी हल्ल्यानंतर गणपत गायकवाड काय म्हणाले होते त्याबद्दल काही दावे केले आहेत.

विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे की, एकनाथ शिंदेंनी उध्दव ठाकरे यांच्याशी गद्दारी केली, ते भाजपाशीसुद्धा गद्दारी करणार आहेत. एकनाथ शिंदेनी दुसऱ्यांचं आयुष्य खराब केलं. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असेपर्यंत महाराष्ट्रात फक्त गुन्हेगार जन्माला येतील. शिंदे हे महाराष्ट्रात गुंड घडवण्याचं काम करत आहेत. एकनाथ शिंदे यांनी माझे कोट्यवधी रुपये खाल्ले, त्यांनी आणि त्यांच्या खासदार मुलाने सगळीकडे भ्रष्टाचार करून ठेवला आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षातील ज्येष्ठ नेत्यांपुढे या सर्व गोष्टी मी मांडल्या, पण त्यांनी त्यावर काही कारवाई केली नाही, हे महायुतीतील आमदार गणपत गायकवाड यांचे हल्ल्यावेळचे शब्द आहेत.

वडेट्टीवार यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये लिहिलं आहे की, महायुतीतील आमदार गणपत गायकवाड यांचे हे शब्द ऐकून महाराष्ट्रातील जनतेला आज काही गोष्टींची खात्री पटलेली आहे की, एकनाथ शिंदे आणि त्यांचे ४० आमदार हे गद्दार आहेत आणि हे भाजपालादेखील मान्य आहे. स्वतःचे राजकीय स्वार्थ साधण्यासाठी भाजपा आणि शिंदे गट एकमेकांशी गद्दारी करतील. महाराष्ट्रात आज गुन्हेगार आणि गुंडांचं राज्य आहे, त्यामुळे सामान्य माणसाला घाबरून गप्प बसण्यापलीकडे पर्याय नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या गुंडांची जी दादागिरी महाराष्ट्रभर सुरू आहे त्याची पूर्ण माहिती गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली होती, असे खुद्द भाजपा आमदार सांगत आहे, तरी यावर कारवाई होत नाही.

वडेट्टीवार म्हणाले, महायुतीने सुसंस्कृत महाराष्ट्राचा उत्तर प्रदेश आणि बिहार करून ठेवला आहे. सत्ताधारी आमदार पोलीस स्थानकात गोळीबार करत आहे, सत्ताधारी आमदार पोलिसांवर हात उचलत आहे, सत्तेचा माज, बंदुकीचा वापर, बदला हे सगळं आज महाराष्ट्राच्या राजकारणात घडत आहे. महाराष्ट्रात जे सुरू आहे तीच खरी मोदींची गॅरंटी आहे!

# लालकृष्ण आडवाणींना भारतरत्न पुरस्कार जाहीर

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण आडवाणी यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान पुरस्कार भारतरत्न जाहीर करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या एक्स खात्यावरून ही माहिती दिली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स पोस्टवर लिहिलंय की, मला हे सांगताना अत्यंत आनंद होत आहे की लालकृष्ण आडवाणी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केलं जाणार आहे. मी त्यांच्याशी संवाद साधला असून या पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.आमच्या काळातील सर्वांत प्रतिष्ठित नेत्यांपैकी एक असलेल्या आडवाणी यांचं भारताच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान आहे. संघटनेच्या तळापासून त्यांनी कामाला सुरुवात केली आणि उपपंतप्रधान पदापर्यंत मजल मारत देशाची सेवा करण्याचे काम केले. केंद्रीय गृहमंत्री आणि माहिती व प्रसारण मंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांनी संसदेत उपस्थित केलेले मुद्दे, त्यांची भाषणे आमच्यासाठी दिशादर्शक आणि समृद्ध असा अनुभव देणारी ठरली आहेत.

गेल्या काही वर्षांपासून लालकृष्ण आडवाणी सक्रिय राजकारणातून अलिप्त राहिले होते. जानेवारी महिन्यात राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. राम मंदिराच्या उभारणीसाठी लालकृष्ण आडवाणी यांनी त्यांच्या उमेदीच्या काळात प्रचंड मोठी चळवळ उभारली. बाबरी मशीदीच्या विवादित जागेवर राम मंदिर व्हावं म्हणून त्यांनीच पुढाकार घेतला होता. त्यामुळे प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्ताने आडवाणी पुन्हा एकदा चर्चेत आले होते. सुरुवातीला त्यांच्या प्रकृती अस्वस्थ्यामुळे त्यांना निमंत्रण नाकारण्यात आलं होतं. यावरून प्रचंड गदारोळ झाला. अखेर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी कृष्ण गोपाल, राम लाल आणि विहिंपचे आलोक कुमार यांनी लालकृष्ण अडवाणी यांच्या घरी जाऊन प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी आमंत्रित केलं होतं. परंतु, प्राणप्रतिष्ठा दिनी अयोध्येत तापमान घसरलं होतं. थंडी वाढली होती, त्यामुळे लालकृष्ण आडवाणी यांनी तिथे जाणं टाळलं.

### २०१५ साली मिळाला होता पद्मविभूषण पुरस्कार


२०१५ मध्ये आडवाणी यांना देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्याच वर्षी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांना भारतरत्न प्रदान करण्यात आला. तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखजी यांनी स्वतः त्यांच्या घरी भेट दिली आणि त्यांना हा सन्मान दिला होता. त्यावेळी वाजपेयी ९० वर्षांचे होते आणि ते आजारी होते. मुखजी यांनी प्रोटोकॉल मोडून माजी पंतप्रधानांना त्यांच्या कृष्ण मेनन मार्गावरील निवासस्थानी हा पुरस्कार प्रदान केला.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून अभिनंदन

प्रखर राष्ट्रभक्त अशा ज्येष्ठ नेते आडवाणी यांनी आपले अखंड आयुष्य समाजकारण आणि राजकारण यासाठी समर्पित केले आहे. अयोध्येत प्रभु श्रीरामचंद्राचे मंदिर व्हावे हे त्यांचे स्वप्न देखील साकार झाले आहे. या मंदिरासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, रथयात्रेचे नेतृत्व या गोष्टी त्यांच्या प्रभावी नेतृत्वशैलीचे उदाहरण आहे. देशाच्या सर्वांगीण विकासाची दृष्टी असणारे आणि सर्वसमावेशक असे त्यांचे नेतृत्व आमच्यासाठी प्रेरणादायी आणि आदरणीय आहे. उत्तम संसदपटू आणि परखड विचारांचे नेतृत्व अशी त्यांची ओळख आहे. त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर होणे अत्यंत आनंददायी बाब आहे. त्यांना उत्तम आयुरारोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, असे अभिष्टचिंतन करून मुख्यमंत्र्यांनी ज्येष्ठ नेते आडवाणी यांचे भारतरत्न पुरस्कारासाठी अभिनंदन केले आहे.

# जमीन मोजणीची अक्षांश, रेखांशासह प्रत मिळणार

**पुणे :** भूमी अभिलेख विभागाकडून जमिनीची हद्द कायम करणे, पोटहिस्सा, सामिलीकरण, बिनशेती, कोटर्वाटप. कोर्टकमिशन आणि विविध प्रकल्पांसाठी भूसंपादन आदींसाठी मोजणीचे काम केले जात आहे. मोजणी झाल्यानंतर अजर्दारांना मोजणी नकाशाच्या क प्रती पुरविल्या जातात. या मोजणी नकाशाच्या क प्रतीमध्ये जागेवर प्रत्यक्ष मोजणी वेळी वहिवाटी किंवा ताब्याप्रमाणे अभिलेखाप्रमाणे येणाऱ्या हद्दी दशर्वून योग्य परिमाणात संबधित टिपा नमूद मोजणी नकाशाची क प्रत पुरविली जाते.



भूमी अभिलेख विभागाने जमीन मोजणीसाठी ह्यई-मोजणीह्य ही संगणक प्रणाली अद्ययावत केली असून आता ई-मोजणी २.० ही नवीन प्रणाली आणली आहे. त्यानुसार मोजणी प्रकरणांमध्ये जमीन मोजणीसाठी जीआयएस आधारीत रोव्हर्स मशीन या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मोजणी करण्यात येते. या मोजणी नकाशावर अक्षांक्ष, रेखांश (कोडिर्नेट्स) असलेली जमीन मोजणीची कप्रत उपलब्ध करून देण्यास शासनाने परवानगी दिली आहे. त्यामुळे जमीन मोजणीनंतरही हद्दीवरून होणारे वाद उद्भवणार नाहीत.

सद्यःस्थितीत जमीन मोजणीसाठी जी.आय.एस आधारीत रोव्हर्स व इलेक्ट्रॉनिक्स टोटल स्टेशन मशीन आदी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. तसेच मूळ भूमापन नकाशांचे डिजिटायझेशन व जिओ रेफरन्ससिंग केलेल्या नकाशांचा वापर केला जात आहे. असे नकाशेच मोजणी नकाशा अंतिम करताना आधार नकाशा म्हणून वापर करण्यात येत आहे. ई मोजणी २.० या संगणक प्रणाली नंदूरबार, वाशिम जिल्ह्यांमध्ये तसेच इतर जिल्ह्यातील प्रत्येकी एका तालुक्यामध्ये लागू करण्यात आली आहे. टप्प्याटप्प्याने ही संगणक प्रणाली संपूर्ण राज्यात लागू केली जाणार आहे. याबाबतचे आदेश महसूल विभागाचे सहसचिव संजय बनकर यांनी प्रसृत केले आहेत.

ई मोजणी २.० या संगणक प्रणालीदवारे स्वीकारण्यात येणारे मोजणी अर्ज जीआयएस आधारीत रोव्हर्सद्वारे मोजणी करण्यात येत आहे. त्यामुळे मोजणी नकाशामध्ये प्रत्येक हद्दीचे अक्षांश व रेखांश प्राप्त होत आहेत. त्यामुळे जमीन मोजणी प्रकरणांमध्ये लगतच्या धारकांचे हद्दीबाबत मोजणीवेळी मानवी चुकांमुळे होणारे लगतच्या गटांमधे एकमेकांच्या हद्दी जाणे किंवा दोन मोजणीमुळे हद्दीमध्ये अंतर पडणे यासारखे वाद, तक्रारी कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे भूमी अभिलेख विभागाकडून सर्व मोजणी जीआयएस आधारीत मोजणी नकाशे पुरविताना अक्षांक्ष, रेखांशासह नागरिकांना मोजणी नकाशा पुरविण्यास तसेच मोजणी नकाशे अक्षांक्ष, रेखांशासह भूमी अभिलेख विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

# नववीतल्या मुलाने दहावीतील मुलाला चाकूने भोसकले

**पुणे :** विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या पुण्यातील पिंपरी-चिंचवडमध्ये शाळेच्या पटांगणात एका विद्यार्थ्याने दुसऱ्या विद्यार्थ्याच्या पोटात चाकूने भोसकले आहे. या घटनेत विद्याथी गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पिंपरी पोलिसांनी घटनेचा तपास करत सहा अल्पवयीन मुलांच्या नातेवाईकांना समजपत्र बजावले आहे. हे सर्व विद्याथी नववी आणि दहावीच्या वर्गात शिक्षण घेत आहेत.

अगदी किरकोळ कारणावरून सहा अल्पवयीन मुलांच्या टोळक्याने दहावीत शिकत असलेल्या अल्पवयीन मुलाला शिवीगाळ करत चाकूने भोसकले आहे. ही घटना १ फेब्रुवारी रोजी पिंपरीतील नामांकित शाळेत घडली आहे. फिर्यादी अल्पवयीन मुलाची इतर अल्पवयीन मुलांनी स्कुल बॅग ओढली, ती फाटली. यावरून त्यांच्यात वाद झाला. दरम्यान, दुसऱ्या दिवशी मुलांनी फिर्यादी अल्पवयीन मुलाला शाळेत आल्यानंतर चाकूने भोसकून जीवे ठार करण्याचा प्रयत्न केला आहे. या गंभीर घटनेनंतर पिंपरी पोलिसांनी गुन्हा दाखल करत या घटनेतील मुलांना समजपत्र दिले आहे. पिंपरी पोलिसांत अल्पवयीन मुलांविरोधात खुनाचा प्रयत्न हे कलम लावण्यात आले आहे.

# वादात सापडलेल्या नाटकावरून आता समाजमाध्यमांत रामायण

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्राच्या विद्यार्थ्यांचे रामायणातील व्यक्तिरेखा असलेले नाटक शुक्रवारी सायंकाळी अखिल भारतीय विद्याथी परिषदेच्या (अभाविप) कार्यकर्त्यांनी बंद पाडले. पात्रांच्या तोंडी आक्षेपार्ह संवाद असल्याचा, धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप अभाविपकडून करण्यात आला. त्यामुळे नाटकाबाबत वाद होऊन कार्यकर्ते, कलाकार विद्यार्थ्यांमध्ये धक्काबुक्कीही झाली. हे प्रकरण पोलिसांत तक्रार दाखल करण्यापर्यंत गेले. मात्र या प्रकरणावरून समाजमाध्यमांत आता प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

ललित कला केंद्रातील विद्यार्थ्यांना मारहाण केली गेली असेल तर या कृत्याचा जाहीर निषेध, अशा शब्दांत ज्येष्ठ अभिनेते वैभव मांगले यांनी त्यांची प्रतिक्रिया मांडली. रंगकमी दीपक राजाध्यक्ष यांनी नाटक बंद पाडण्याच्या घटनेचा निषेध करून ललित कला केंद्राला पाठिंबा दिला.

तर दिग्दर्शक संगीतकार अजय नाईक यांनी या नाटकावरून टीका केली. आम्ही कॉलेज जीवनात अनेक सादरीकरणे केली. रामलीला नावाचे नाटक सादर करता आणि राम-सीता यांचे वस्त्र परिधान करून तोंडी शिवराळ संवाद? हे होतंय पुणे विद्यापीठात? कोण आहेत ही लोकं? कोण आहेत हे शिक्षक जे असले ह्यललितह्ल विद्यार्थी घडवत आहेत? वैचारिक दारिद्य आणि वैचारिक अधोगती आहे ही. मी धिक्कार करतो या विकृतीचा, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

# पूना हॉस्पिटल जवळील पूल महिनाभर राहणार बंद

**पुणे :** डेक्कन जिमखाना भागातील यशवंतराव चव्हाण पूल दुरुस्तीच्या कामासाठी २९ फेब्रुवारीपर्यंत बंद राहणार आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी केले आहे. यशवंतराव चव्हाण पुलाच्या दुरुस्तीचे काम शुक्रवारपासून (२ फेब्रुवारी) सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे या भागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत.

२९ फेब्रुवारीपर्यंत पुलाचे बेअरिंग आणि एक्सपान्शन जॉईंट बदलण्यात येणार आहे. त्यामुळे पूल वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. नवी पेठेतील पूना हॉस्पिटलकडून डेक्कनकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी गांजवे चौकातून टिळक चौक, छत्रपती संभाजी पूल (लकडी पूल), खंडोजीबाबा चौक या मार्गाचा वापर करावा. कर्वे रस्त्यावरून नवी पेठेकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी खंडोजीबाबा चौक, छत्रपती संभाजी पूल, खंडोजीबाबा चौकमार्गे इच्छितस्थळी जावे, असे आवाहन उपायुक्त बोराटे यांनी केले आहे.

# RBIचे पेटीएमवर निर्बंध

**नवी दिल्ली :** देशातील सर्वात मोठी फिनटेक कंपनी, पेटीएमला भारतीय रिझर्व्ह बँकेने दणका दिला. यामुळे बाजारात खळबळ उडाली असून ग्राहकांमध्ये संभ्रम आणि गोंधळ सुरू आहे. पेटीएम पेमेंट्स बँकेवर कारवाई करत रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) ऑनलाइन पेमेंट ॲपला मोठा धक्का दिला आणि पेटीएम पेमेंट्स बँकेच्या अनेक सेवांवर बंदी घातली. आरबीआयने २९ फेब्रुवारीनंतर टॉप अप ते क्रेडिट ट्रान्झॅक्शनपर्यंत अनेक सेवा बंद करण्याचे आदेश दिले.

पेटीएम पेमेंट्स बँकेवर रिझर्व्ह बँकेच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्यास आरोप करण्यात आले आणि त्यानंतर त्याच्याविरोधात कठोर निर्णय घेण्यात आला.

सर्वप्रथम लक्षात घ्या की आरबीआयने पेटीएमवर नाही तर पेटीएम पेमेंट्स बँकवर कारवाई केली आहे. म्हणजे जर तुम्ही पेटीएम ॲप वापरत असाल पण पेटीएम पेमेंट्स बँकेची सेवा घेत नसाल तर तुमच्या ॲपवरील सुविधेवर कोणताही परिणाम होणार नाही. एकूणच २९ फेब्रुवारीनंतरही तुमचे पेटीएम ॲप पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहील.

२९ फेब्रुवारीनंतर पेटीएम पेमेंट्स बँकेच्या वॉलेटमधील शिल्लक रकमेसाठी समस्या येऊ शकतात. म्हणून, विहित मर्यादेपूवी वॉलेट शिल्लक हस्तांतरित करा.

रिझर्व्ह बँकेने पेटीएम पेमेंट बँकेवर कारवाई केल्यामुळे याच्याशी संबंधित सेवांवरच परिणाम होईल. २९ फेब्रुवारीनंतर तुम्ही पेटीएम पेमेंट बँकेतून वढकवापरू शकणार नाही, पण तुम्ही पेमेंटसाठी इतर बँकांचा UPI आयडी वापरू शकता.

# पगारदार निम्नमध्यमवर्ग, मध्यमवर्गाचे काय ?



**सुरेश कोळी**

काही प्रसंग असेच असतात की त्यावरील संभाव्य प्रतिसाद हा अगदी तंतोतंत ठरल्याप्रमाणेच असतो. अर्थमंत्री निमर्ला सीतारामन यांचे अथर्संकल्पसदृश लेखानुदानाचे भाषण हे मोदी सरकारच्या केवळ गेल्या वर्षभरातीलच नव्हे तर मागील दशकभरातील कर्तृत्वांचा पाढा वाचणारे असेल, हे पूर्वानुमानितच होते. निवडणुकांच्या तोंडावर त्यांच्या भाषणाचा सूर हा असा असणे अपेक्षितच होते. अगदी विरोधी बाकांवरून अथर्संकल्प कसा गरीब, निम्नमध्यमवगीय घटकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने अपयशी ठरला, अशा ठरावीक टीकेच्या पठडीप्रमाणेच, आता सत्ताधारी बाकावरून केलेल्या सीतारामन यांच्या भाषणातही कोणताच आश्चर्याचा घटक नव्हता. २०१९ प्रमाणे पहिल्यांदा फेब्रुवारीत आणि नंतर जुलैमध्ये असे एकाच वर्षात दोनदा अथर्संकल्प सादर करण्याचा मोह यंदा टाळला गेला, हे उत्तमच.

ज्या योजना सुरू आहेत त्यात सातत्य राहील आणि त्यांची यशमात्रा ठरणारे उद्दिष्ट विस्तारले जाईल, यावरील अथर्मंत्र्यांचा भरही स्वागतार्हच. २०४७ साली "विकसित भारत" साकारण्याची महत्त्वाकांक्षा, रेल्वे, बंदरे आणि विमानचालन आदी क्षेत्रांच्या विस्तारासाठी भांडवली परिव्ययामध्ये घसघशीत ११ टक्क्यांची वाढ आणि आगामी आर्थिक वर्षामध्ये काटेकोर वित्तीय व्यवस्थापनासह तुटीच्या ठिगळाला आवळून कमी करण्याचे त्यांनी दिलेले वचन हे त्यांच्या भाषणाचे ठळक वैशिष्टय ठरावे. खूप लांबचे आणि दीघर्कालीन उद्दिष्ट असले तरी अथर्मंत्र्यांच्या दृढ संकल्पाचा आणि विवेकाचा हा प्रत्यय खराच. सामान्य करदात्यांसाठी कोणताही दिलासा नसला, तरी कोणताही नवीन करभार नाही याचाच आनंद. तर भांडवली बाजारातील गुंतवणूकदार वर्ग अपायकारक काहीही नसल्याने आश्वस्त.

एकंदरीत लेखानुदानाच्याच प्रथेला पुरेपूर साजेसे असेच हे अथर्मंत्र्यांचे भाषण. लोकसभेच्या निवडणुकांनंतर नवीन सरकार येईतोपर्यंत आवश्यक तेवढया खर्चाची बेगमी यासाठी म्हणून हे लेखानुदान. ते केवळ त्या उद्देशापुरते असेल याचा नेमका परिचय म्हणजे त्यांचे भाषण. अगदी त्यांच्या अथर्मंत्रालयाला कर कपातीच्या निणर्यासाठी एका दिवसाची वाट पाहावीशीही वाटली नाही. अंतरिम अथर्संकल्पाच्या पूवर्संध्येला मोबाइल फोनच्या सुटया घटकांवरील आयात शुल्कात कपातीचा निर्णय घेतला गेला, यावरून त्याचे औचित्य काय ते स्पष्ट व्हावे. तरी या निमित्ताने अथर्मंत्र्यांनी मोदी सरकारच्या गत १० वर्षातील पीएम जनधन ते पीएम सन्मान आणि पीएम जनमनपर्यंत जवळपास अडीच-तीन डझनावारी योजनांचा आवर्जून उल्लेख करणे नक्कीच लक्षणीय ठरते. तथापि ही जंत्री म्हणजे आधीची राजवट मुळातच नालायक आणि कृतिशून्य होती हे दाखवण्यासाठीच. तसे केले तरच मोदी सरकारच्या दशकभराचे हे प्रगती-पुस्तक आकाराला येईल, हेही त्यांनीच सूचित केले. पण सीतारामन इतपरच थांबल्या नाहीत. अलीकडच्या राजकारणाच्या चिखलात सामान्य बनलेल्या रीतीला अनुसरून त्यांनी आणखी एक घोषणा केली. मोदींआधीच्या राजवटीने अर्थव्यवस्थेची वासलात लावली अशा निष्कर्षाला त्या पोहोचल्या आणि ते श्वेतपत्रिकेतून मांडण्याचा घाटही अथर्मंत्र्यांनी योजला आहे. याची घोषणा त्यांनी अथर्संकल्पीय भाषणातून करणे हे तर आणखीच अजब. वतर्मानातील प्रगतीची मोजदाद ही अशाच तऱ्हेने होते हे कितीही खरे असले तरी अशा प्रकारे शिळया कढीला ऊत देणे हा व्यर्थ खटाटोपच.

उज्ज्वल भविष्याचे विद्यमान सरकारचे स्वप्नरंजन हे एकंदरीत अशाच धाटणीचे आहे. वर्ष, दोन वर्षांचे त्यात टप्पे नाहीतच. तर थेट २०४७ सालच त्यासाठी उजाडावे लागेल. याचा अर्थ सर्वांगीण, सर्वस्पर्शी आणि सर्वसमावेशी" प्रगती साकारणाऱ्या आजच्या योजनांचा मार्ग टोक गाठेल ते दोन तपांनंतर. या अमृतकाळा"साठी आजच्या तरुण अर्थात अमृतपिढीला आजपासून पंचप्राण साधनेची अथर्मंत्र्यांनी हाक दिली आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लोकांचे क्षमता वर्धन आणि सशक्तीकरण आवश्यक असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. लोकांच्या क्षमता वधर्नाची गोष्ट करताना अथर्मंत्र्यांनी सरकारच्या क्षमता वधर्नाकडे लक्ष देणे खरे तर अधिक श्रेयस्कर ठरावे. वस्तुतः नव्वदच्या दशकात अमलात आलेल्या मुक्त आर्थिक धोरणातून विकासनिमिती झाली आणि आज विकसित भारत ही जनमानसाची आकांक्षा बनली. परंतु हा विकास विषमतामूलक आहे, तो काही मोजक्यांचेच भले करणारा आहे, हे भानदेखील सरकारने विसरता कामा नये. विकासगाडयात पिछाडीवर राहिलेल्यांना सामाजिक आधार आणि संरक्षण देण्याचे प्रयास सुरूच ठेवावे लागतील. त्यासाठी सरकारकडे पुरेशी आर्थिक संसाधने असावीत हे ओघाने आलेच. अशा योजनांची अंमलबजावणी आणि इच्छित हस्तक्षेपाची सरकारची क्षमता काय, हे ठरते सरकार कर रूपाने कमावते किती यावर. आपण ज्या विकसित भारताची महत्त्वाकांक्षा राखली आहे, त्या अथी युरोप – अमेरिकेच्या तुलनेतच आपल्या प्रगतीची येथून पुढे मोजदाद करण्याची रीत अंगवळणी पडायला हवी. अमेरिका, युरोप ते ओईसीडी देशांमध्ये कर महसुलाचे देशांतर्गत स्थूल उत्पादन अर्थात जीडीपीतील प्रमाण हे किमान ३० टक्के वा त्याहून अधिक आहे. तर आपल्या बाबतीत हे गुणोत्तर जेमतेम ११ टक्के आहे. गेली कित्येक वर्षे या आघाडीवरील प्रगती यथातथाच आहे. भारताच्या बाबतीत कर ते जीडीपी गुणोत्तर ११.५३ टक्के भरते. जे २०२१-२२ आर्थिक वर्षातील म्हणजे करोना दुसऱ्या लाटेच्या आघातांनी प्रभावित कालावधीतील ११.५४ टक्के गुणोत्तरापेक्षाही कमी आहे. अधिक फोड करायची झाली तर देशाच्या एकूण कर महसुलात प्रत्यक्ष कराचा म्हणजेच वैयक्तिक प्राप्तिकर आणि कंपनी कर यांचा वाटा हा जेमतेम ३५ टक्के आहे. विकसित देशांच्या बाबतीत हे प्रमाण ७५ टक्के इतके असते.

गरीब, महिला, युवक आणि अन्नदाता शेतकरी हे अथर्मंत्र्यांनी सांगितलेले चार प्राधान्यक्रम आहेत. मग विकासवाटेत मागे पडलेल्या पगारदार निम्नमध्यमवर्ग, मध्यमवर्गाचे काय? विशेषतः ज्याच्यामुळे बाजारपेठा फुलतात, ज्याच्या खरेदी-उपभोगातून जीडीपीत दर शेकडा ६० रुपयांचे योगदान जवळपास येत असते, त्यालाच वाऱ्यावर सोडायचे काय? त्यांची क्रयक्षमता वाढली, पर्यायाने वस्तू व सेवांची मागणी वाढली तरच खासगी क्षेत्रातून विस्तार आणि नवप्रकल्पांसाठी गुंतवणूक वाढेल, या सूत्राकडे दुर्लक्ष कसे करता येईल? समाजातील या सर्वात आकांक्षावान घटकाच्या प्रतारणेची किंमत मोजावीच लागते. देशभरात हरराज्यात सुरू असलेल्या आरक्षण आणि तत्सम अस्मितावादी आंदोलनांना या अर्थ-उपेक्षित घटकांतूनच इंधन मिळताना दिसत आहे. हेही विसरून चालणार नाही की, कोणताही विकसित देश हा सुखी व संपन्न मध्यमवर्गाशिवाय साकारताच येणार नाही.

शेतीचेदेखील खरेच भले करायचे, तर शेतीविषयक संशोधन व विकास, ग्रामीण पायाभूत सोयी-सुविधा, रस्ते, वीज, सिंचन आणि बाजारपेठांचा विकास यावर खर्च होणे स्वागतार्ह ठरेल. यंदा अथर्संकल्पाने, जय जवान, जय किसान, जय विज्ञान यांना "जय अनुसंधान" हे पालुपद जोडले असले तरी प्रत्यक्षात या बाबींवरील तरतुदी यथातथाच दिसतात. संशोधन आणि विकासाची प्रक्रिया दीर्घ काळ चालत राहते, त्याचा परिणाम दिसायलाही वेळ लागतो. तो चटकन नजरेत भरेल असा असतोच असेही नाही. अर्थातच त्यातून राजकीय परताव्याची शक्यताही जेमतेमच असते. म्हणूनच मग अशा वृथा गोष्टींकडे कानाडोळा, असा सारा हिशेब आहे.

करोनाकाळात शहरांमधून गावाकडे परतलेल्या लक्षावधी स्थलांतरित मजुरांसाठी जीवनदायी ठरलेल्या "मनरेगा" योजनेचा नामोल्लेख करावा, असेही अथर्मंत्र्यांना वाटले नाही. रोजगाराच्या स्थितीत खूप लवकरच चमत्कारिक बदल घडून येत नसतो. त्यामुळे मनरेगासारख्या योजनांचा आधार अपरिहार्यच ठरत असतो. या योजनेची उपासमार म्हणजे ग्रामीण भारताला मोठया सामाजिक संकटाच्या खाईत लोटणेच ठरेल. जुन्या योजनांची जंत्री वाचली जात असताना, दरसाल दोन कोटी रोजगार निर्मिण्याच्या आश्वासनाचे काय झाले हेही विचारले गेले पाहिजे. उत्पादन क्षेत्रातून रोजगाराला २०१४ पासूनच उतरती कळा लागली. आज आहे त्या नोकऱ्या गमावल्या जातील असे संकट अनेकांपुढे उभे ठाकले आहे, तर दरवषी रोजगारक्षम बनणाऱ्या तरुणांना अल्पवेतनी आणि अनिश्चित नोकऱ्यांची कास धरण्याशिवाय गत्यंतर राहिलेले नाही. तुकोबा म्हणून गेले आहेत, त्याप्रमाणे "दावूनी वैराग्याची कळा, भोगी विषयाचा सोहळा" याचाच हा प्रत्यय आहे. अथर्संकल्पीय भाषणाच्या सुरुवातीला "सबका साथ" आणि गरीब, युवा, महिलांसाठी सहानुभूतीचे शब्द. प्रत्यक्षात कोणत्याही ठोस घोषणेविना ही शब्दसेवा संवेदनशून्यच ठरते. अमृतकाळाची आस ठेवणाऱ्या लांबच्या पल्ल्याच्या प्रवासात आरोग्याची काळजी महत्त्वाचीच. अमृतपिढीने हा प्रवास दुःख, वेदना विसरून अथकपणे करावयाचा तर वेदनाहारी अमृतांजन आवश्यकच. तूर्त त्याचीच सोय अथर्मंत्र्यांनी केली.

## मांजरी उप बाजारात खोतीदारांना संचालक मंडळाकडून परवानगी

### बाळासाहेब भिसे यांचे आमरण उपोषण मागे




**हडपसर :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मांजरी उपबाजारात खोतीदारांच्या अटी शती मान्य करत खोतीदारांना संचालक मंडळाकडून अखेर प्रवेश देण्याचे प्रशासनाने मान्य केले, खोतीदारांच्या मागण्या मान्य झाल्याने बाळासाहेब भिसे यांनी आमरण उपोषण मागे घेत रयत शेतकरी संघटनेने आत्मदहन आंदोलन स्थगित करण्यात आले.

बाळासाहेब भिसे यांनी आमरण उपोषण करीत संचालक मंडळास धारेवर धरत आमरण उपोषण सुरू केले होते.शती अटी मान्य झाल्याने आठव्या दिवशी उपोषण मागे घेतले.

मांजरी उपबाजारात ठेकेदार व्यापाऱ्यांना बाजार समितीने मज्जाव केल्याने गेल्या आठ दिवसापासून बाळासाहेब भिसे यांनी आमरण उपोषण सुरू केले होते तर रयत शेतकरी संघटनेने आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.प्रकरण हाताबाहेर जात असल्याने संचालक मंडळांनी निर्णय घेऊन उपोषण मागे घेण्याची विनंती सचिव राजाराम धोंडकर यांनी केली. खोतीदार व्यापाऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य झाल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले तसेच उपोषण आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव राजाराम धोंडकर, विभाग प्रमुख किरण घुले, रयत शेतकरी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष ॲड.रवीप्रकाश देशमुख, सरचिटणीस अंकुश हंबीर, उपाध्यक्ष रामदास कोतवाल, उपाध्यक्ष हेमंत चौधरी, उत्तर महाराष्ट्र युवा अध्यक्ष अजय सावंत, पश्चिम महाराष्ट्राचे कायदे सल्लागार बबनराव गायकवाड, पुणे जिल्हा उपाध्यक्ष संतोष महाडिक, सरचिटणीस तानाजी महाडिक, पुणे जिल्हा अध्यक्ष कल्पना गव्हाणे, कार्याध्यक्ष अश्विनी कुंजीर, सरचिटणीस माधुरी वडघुले, प्रियांका आतकिरे, हर्षवर्धन देशमुख , माजी नगरसेवक मारुती आबा तुपे काँग्रेसचे ओबीसी शहराध्यक्ष प्रशांत सुरसे जीवन जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस हडपसर अध्यक्ष डॉ. शंतनू जगदाळे, माजी सरपंच सचिन तुपे, उपसरपंच गोकुळ ताम्हाणे, पुरुषोत्तम कुंजीर आदींनी आंदोलन व उपोषणास पाठिंबा दिला होता.

यावेळी सर्व खोतीदार शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या आठ दिवसापासून भिसे यांचे उपोषण आंदोलन सुरू होते संचालक मंडळाने काही अटी टाकून खोतीदारांना परवानगी दिली होती मात्र अटी जाचक असल्याने खोतीदारांनी त्यास विरोध केला, चर्चेतून खोतीदारांच्या अटी मान्य केल्या व त्यांना मांजरी उप बाजारात परवानगी दिली याचे पत्र सचिव राजाराम धोंडकर यांनी दिल्यानंतर त्यांच्याच हस्ते ज्यूस पिऊन बाळासाहेब भिसे यांनी उपोषण आंदोलन मागे घेतले.

यावेळी बाळासाहेब भिसे यांनी सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, शेतकरी संघटना व पाठिंबा दिलेल्या सामाजिक संस्थांचे आभार मानले.

एकीकडे बाजार समितीचे सचिव आंदोलकांशी वाटाघाटी करत असताना संचालक सुदर्शन चौधरी इतर शेतकरी व्यापाऱ्यांना घेऊन मार्केटमध्ये घोषणा देऊन वातावरण दूषित करत होते, खोतीदारांना प्रवेश देताना त्यांना मार्केटमध्ये सुविधा व संरक्षण देण्याचे काम केले जाईल असे सचिव धोंडकर यांनी सांगितले.

गेल्या आठ दिवस आमरण उपोषण सुरू केलेल्या बाळासाहेब भिसे यांना मनोज जरांगे यांनी देखील दूरध्वनीवरून पाठिंबा दिला, तसेच विविध राजकीय पक्षाचे नेते आजी-माजी आमदार, पदाधिकारी व सामाजिक संस्थांनी भेटून पाठिंबा दिला होता, आंदोलनाची व्याप्ती लक्षात घेता संचालक मंडळाने निर्णय घेऊन खोतीदारांना परवानगी दिली, त्यामुळे अहिंसेच्या मार्गाने भिसे यांनी केलेल्या आंदोलनाचा विजय झाला.

## बोपदेव घाटात लुटणाऱ्या टोळीचा कोंढवा पोलीसांकडून पर्दाफाश

**हडपसर :** बोपदेव घाटात रात्री अपरात्री विद्यार्थी व नागरीकांना लुटणा-या टोळीस कोंढवा पोलीसांकडून अटक करण्यात आली आहे.

पुणे शहरात रात्रीच्यावेळी बोपदेव घाटात होणा-या जबरी चोरीच्या अनुषगांने कोंढवा पोलीस ठाणे हद्दीतील जबरी चो-यांच्या गुन्हयातील आरोपींचा शोध घेण्याबाबत पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ५, आर. राजा यांनी सुचना दिल्या होत्या. सदर सूचनेवरून कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक गुन्हे संदिप भोसले यांनी बोपदेव घाटात साध्या वेशात सापळा रचुन कारवाई करणेबाबत आदेश दिले ,त्याअनुषंगाने तपास पथक अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक दिनेशकुमार पाटील, सहा पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे, पोलीस अंमलदार पो. हवा. विशाल मेमाणे, पो.हवा. निलेश देसाई, पो. हवा सतिश चव्हाण, पो. हवा लवेश शिंदे, पो. शि. शाहीद शेख, पो. शि.लक्ष्मण होळकर, पो. शि. संतोष बनसुडे, असे कोंढवा पोलीस स्टेशन अभिलेखावरील दाखल झालेल्या जबरी चोरी गुन्ह्यांचा तपास करीत असताना त्यांनी बोपदेव घाट परीसरात सापळा रचुन स्टाफच्या मदतीने बोपदेव घाटमाथ्यावर साध्या वेषात रोडच्या बाजुला थांबुन संशयीत वाहने व इसमांचा शोध घेत असता तेवढ्यात दोन दुचाकी वाहनांवर तीन इसम सासवड कडुन पुण्याच्या दिशेने येत असल्याचे दिसुन आले. त्यातील एका दुचाकीस पुढील व मागील बाजुस नंबर प्लेट नव्हती. ते घाटमाथ्यावर फिरत असणा-या लोकांकडे पहात आपआपसात बोलत होते त्यामुळे त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्यांच्याकडे जावुन त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी तेथुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला. त्यात दोन इसमांना ताब्यात घेण्यात कोंढवा पोलीसांना यश आले. त्यांचेकडे चौकशी केली असता एक पल्सर दुचाकी, एक चाकु मिळुन आला त्यांच्यासोबतचा दुस-या दुचाकीवरील एक इसम हा अंधाराचा फायदा घेवुन तेथुन पळुन गेला. भेटलेल्या दोन इसमांना नाव पत्ता विचारले असता त्यांचे नावे नागेश संजय चव्हाण रा. मोमीन आखाडा राहुरी जि अहमदनगर व चेतन सिताराम खैरे रा. गाव नाझरे कडे पठार, खैरेवाडी ता पुरंदर असे असल्याचे सांगीतले. सदर आरोपी यांच्याकडे कोंढवा पोलीस स्टेशन हद्दीतील व पुणे शहरातील जबरी चोरीच्या गुन्ह्यांच्या अनुषगांने सखोल व कौशल्यपूर्ण तपास केला असता, त्यांच्याजवळील नंबर प्लेट नसलेली पल्सर दुचाकी पल्सर गाडी ही काही दिवसापूवी बोपदेव घाटातुन तीन तरूणांना चाकुचा धाक दाखवुन सदरची दुचाकी चोरी करुन नेल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांनी सदरची दुचाकी ही चोरुन नेली असल्याबाबत कबुली दिल्याने

आरोपींकडुन खालील प्रमाणे गुन्हा उघड करण्यात आला आहे. आरोपींना अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोंढवा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाई अप्पर पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, परिमंडळ ५ आर राजा, पोलीस उपायुक्त शाहुराव साळवे वानवडी विभाग कोंढवा वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे,संदीप भोसले, पोलीस निरीक्षक गुन्हे यांच्या मार्गदशर्नाखाली कोंढवा पोलीस स्टेशन येथील तपास पथकाचे सह्य पोलीस निरीक्षक दिनेश पाटील, सहा पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे, पोलीस हवालदार विशाल मेमाणे, पो. हवा. निलेश देसाई, पो. हवा.सतिश चव्हाण, पो. हवा.लवेश शिंदे, पो.अंमलदार शाहीद शेख, पो.अंमलदार लक्ष्मण होळकर, पो. अंमलदार संतोष बनसुडे, यांच्या पथकाने कारवाई करीत बोपदेव घाटात लुटणा-या टोळीचा पर्दाफाश करीत अटक केली.

*कोंढवा पोलिस स्टेशन हद्दीत गस्त वाढविण्यात आली आहे .बोपदेव घाटाकडे जाताना रस्त्याच्या कडेला बसलेल्या लोकाना सूचना करण्यात आल्या आहेत. रात्री अपरात्री कोणीही विनाकारण घाट परिसरात फिरू नये.कांही संशय आल्यास पोलीसांशी संपर्क करावा.*

**- संतोष सोनवणे**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पोलिस स्टेशन

## जयंत पाटील यांच्या उपस्थितीत उद्या राष्ट्रवादीचा पाटणमध्ये मेळावा

**संजय कांबळे -**

**पाटण :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पाश्वर्भूमीवर पाटण विधानसभा मतदारसंघातील राष्टवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता मेळावा सोमवार दिनांक ५ फेब्रुवार रोजी सकाळी ११ वा. श्रीराम मंदिर, पाटण येथे होणार आहे. हा मेळावा राष्टवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माजी मंत्री आ.जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. तसेच यावेळी माजी मंत्री आ. बाळासाहेब पाटील, माजी मंत्री आ. शशिकांत शिंदे, सातारा जिल्हा मध्यवती सहकारी बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, जिल्हा अध्यक्ष सुनील माने व पक्षाचे मान्यवर पदाधिकारीही उपस्थित असणार आहेत . अशी माहिती पाटण तालुका राष्टवादी काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ शेलार व सरचिटणीस सुभाषराव पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

या मेळाव्याच्या माध्यमातून आ.जयंत पाटील कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पाश्वर्भूमीवर पक्षाची मोर्चेबांधणी व संघटना बांधणीच्या दृष्टीने हा मेळावा महत्त्वाचा असणार आहे. तरी या मेळाव्यासाठी पक्षाचे सर्व आजी/माजी पदाधिकारी, सर्व सेलचे प्रमुख, आजी/माजी जि.प. सदस्य, पं.स.सदस्य, आजी/माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक/नगरसेविका, आजी/माजी सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य यांनी उपस्थित राहावे अशी सुचनाही त्यांनी या पत्रकाद्वारे दिली.

दैनिक राजदंड

प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक नियुक्त करण्याबाबत TRAINEE REPORTERS, SUB-EDITORS पाहिजेत

पत्रकारितेतील **मानदंड ठरणाऱ्या दै. राजदंडची (MARATHI) पुणे आवृत्ती आणि THEDEMOCRAT.LIVE (ENGLISH)** नुकतीच सुरू झाली आहे. शहर व जिल्ह्यातील राजकीय घडामोडी, सामाजिक समस्या, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक, उद्योग विश्वातील बदलाची माहिती वाचकांपर्यंत पोहचविण्याचा या वृत्तपत्राचा मानस आहे. प्रिंट, ऑनलाईन, युट्यब या माध्यमात राजदंड मीडिया समूहाचे काम चालणार आहे.

पत्रकारितेत करिअर करू पाहणाऱ्या युवक-युवतीसाठी **दै. राजदंडचे** व्यासपीठ दिशादर्शक ठरणार आहे. नवोदित पत्रकारांना हा महत्वाचा प्लॅटफार्म आहे. प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक म्हणून काम करण्याची इच्छा असणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना **दै. राजदंडमध्ये** संधी उपलब्ध करून देत आहे. तरी याची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना द्यावी, ही विनंती.

**कल्पना सुर्वे,**
**संचालक,** (HR) दै. राजदंड, पुणे
email: rajdand.pune@gmail.com

**मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-**rajdand.pune@gmail.com
**या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.**

# पुण्यात ओला कचरा न जिरविणाऱ्या आस्थापनांची होणार तपासणी

**पुणे :** प्रतिदिन १०० किलोपेक्षा जास्त ओला कचरा निर्माण करणाऱ्या अनेक आस्थापनांमधील कचरा जिरविण्याची यंत्रणा (बल्क वेस्ट जनरेटर्स) बंद असल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित अस्थापनांमधील ओला कचरा न उचलण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या आस्थांपनाची सात दिवसांत तपासणी करण्याचे आदेश घनकचरा विभागाने क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहेत.

नागरी घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २०१६ अन्वये प्रतिदिन १०० किलो कचरा निर्माण करणाऱ्या कोणत्याही गृहसंस्था, बंगले, रुग्णालये, नर्सिंग होम, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, अन्य शैक्षणिक संस्था, वसतीगृहे, हॉटेल्स, मंगल कार्यालये, व्यावसायिक आस्थापना, बाजारपेठा, केंद्र सरकारच्या विभागांच्या इमारती, धार्मिक स्थळे, क्रीडा संकुले यांनी जैव विघटनशील कचऱ्याची विल्हेवाट त्यांच्याच आवारात कंपोस्टिंग, बायोमिथनायझेशन किंवा अन्य तंत्रज्ञानाद्वारे लावणे बंधनकारक आहे.

त्यानुसार महापालिकेने प्रतिदिन १०० किलो कचरा निर्माण करणाऱ्या सोसायट्या, रुग्णालये, हॉटेल्स, महाविद्यालये तसेच माहिती आणि तंत्रज्ञान कंपन्यांची यादी क्षेत्रीय कार्यालयाच्या सहायक आयुक्तांना उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार या आस्थापनांकडे ओला कचरा जिरविण्याची यंत्रणा उपलब्ध आहे किंवा नाही, याची माहिती संकलित करण्यासंदर्भात आदेश देण्यात आले होते. प्रकल्प कार्यान्वित नसलेल्या आस्थापनांना नोटीस देऊन दंडात्मक कारवाई करणे आवश्यक असतानाही प्रभावी दंडात्मक कारवाई करण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचे दैनंदिन अहवालावरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ओला कचरा जिरविण्याचा ताण महापालिकेवर येत आहे. त्यामुळे पुढील सात दिवसांच्या आत क्षेत्रीय कार्यालयांनी पाहणी करावी, असे आदेश घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त संदीप कदम यांनी दिले आहेत.



# पाटण येथे बच्चू कडू यांच्या हस्ते प्रहारच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**पाटण :** प्रहार जनशक्ती पक्षाचे पाटण तालुका अध्यक्ष शुभम उबाळे यांच्या सौजन्याने पाटण येथे सुरू करण्यात आलेल्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या हस्ते करण्यात आले,

प्रहार जनशक्ती पक्षाचे पाटण तालुका अध्यक्ष शुभम उबाळे , पुणे जिल्हा प्रमुख मंगेश ढमाल,रुपेश सावंत, उद्धव लोहार , व प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.

एका कार्यक्रमासाठी पाटण तालुका दौ-यावर आलेल्या आमदार बच्चू कडू यांनी कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव पाटण शहरात भेट दिली, यावेळी कडू यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी नागरिकांनी बच्चू कडू यांना विविध मागण्यांचे




निवेदन दिले.

मराठा क्रांती मोर्चा,व शहरातील विविध संघटना, नागरिकांनी पाटण शहरात आलेल्या बच्चू कडू यांचे स्वागत केले. यावेळी प्रहारचे कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बसचा दरवाजा अचानक उघडल्यामुळे विद्यार्थिनी कोसळली रस्त्यावर

प्रतिनिधी। गोवन वार्ता

**फोंडा :** कुंडई येथे धावत्या खासगी बसचा दरवाजा अचानक उघडून एक विद्यार्थिनी रस्त्यावर कोसळण्याची घटना गुरुवारी दुपारी घडली. या प्रकरणी म्हार्दोळ पोलिसांनी अपघाताचा गुन्हा नोंद केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी एक विद्यार्थिनी फोंडा येथील आपल्या घरी जात होती. कुंडई येथे बसस्थानकावर उतरण्यासाठी युवती बसच्या दरवाजाजवळ थांबली होती. परंतु अचानक बसचा दरवाजा उघडल्याने विद्यार्थिनी रस्त्यावर कोसळून किरकोळ जखमी झाली. तिच्यावर इस्पितळात उपचार करून घरी पाठविण्यात आले. म्हार्दोळ पोलिसांनी अपघाताचा गुन्हा नोंद केला आहे.

## हरमलात परप्रांतीय लोकांकडून चोऱ्या

वार्ताहर। गोवन वार्ता

**हरमल :** येथील पर्यटन हंगाम ऐनभरात असून पर्यटकांबरोबर परप्रांतीय राज्यात दाखल होतात. ही कुटुंबे हरमल येथे बस स्थानकानजिक राहत असून भुरट्या चोऱ्यांचे प्रकार वाढले आहेत. दिवसाढवळ्या हातसफाई होत असल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

काही दिवसांपूर्वी तिठा भागातील एटीएमकडे संतापजनक प्रकार घडला. विदेशी पर्यटक जोडप्याने एटीएम कक्षात जाऊन पैसे घेतले व आपल्या दुचाकीकडे वळले. त्यांच्या दुचाकीला बॅग होती व त्या बॅगेत किमती साहित्य होते. ती बॅग लंपास करत चोरांनी पळ काढला. मात्र, तेथील स्टँडवरील पायलटनी भटक्या मुलांवर संशय व्यक्त केला. त्यांनी धाव घेत मुद्देमाल ताब्यात घेतला. मुलांनी दिवसाढवळ्या हातसफाई केल्याने नागरिक अचंबित झाले.

या घटनेनंतर ही मुले परिसरात दिसली नसल्याचे नागरिकांनी सांगितले. पोलिसांनी भीक मागणाऱ्यांवर कारवाई केल्यास भिकाऱ्यांची संख्या कमी होईल व चोरीच्या घटना घडणार नाहीत. या भागात पोलिसांची गस्त वाढवण्याची मागणी होत आहे.

## अग्निशामक दलाकडून आग आटोक्यात : कार, दुचाकीचे नुकसान

# मडगावात कचऱ्याला, नावेलीत वाहनांना आग

प्रतिनिधी। गोवन वार्ता

**मडगाव :** येथील पालिका इमारतीच्या मागील बाजूला पार्किंग प्रकल्प होणाऱ्या जागेवर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साठवून ठेवण्यात आले होते. त्याला शुक्रवारी दुपारी साडेतीनच्या दरम्यान आग लागली. मडगाव अग्निशामक दलाकडून तासाभराच्या प्रयत्नांनी आग नियंत्रणात आली. दरम्यान, नावेली डोंगरी परिसरातही आग लागण्याच्या घटनेत एक कार व दुचाकी जळून खाक झाली.

मडगाव पालिकेच्या मागील जागेत बहुमजली पार्किंग प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव आहे. अजूनही त्या कामाला सुरुवात झालेली नाही. त्या जागेवर पालिकेकडून कचरा आणून टाकण्यात येतो व डस्टबीनही तिथेच ठेवण्यात येतात. दुपारी लागलेल्या आगीत डस्टबिनसह इतर कचरा जळाला. मडगाव अग्निशामक दलाने दोन गाड्या पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण आणले.



कचऱ्याला लागलेली आग विझविताना अग्निशामक दलाचे जवान.



आगीत जळालेली कार.

**ब्लॅक स्पॉट स्वच्छ करणार : नगराध्यक्ष**

आग कशी लागली याची माहिती नाही. आता आग विझवण्यात आली असल्याचे नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी सांगितले. तसेच शहरातील जे ब्लॅक स्पॉट असतील, नारळाचा कचरा असेल ते स्वच्छ करण्याचे निर्देश दिलेले आहेत, असेही स्पष्ट केले.

### नावेलीत आगीत कार, दुचाकी जळून खाक

डोंगरी नावेली येथील ज्योकीम बारनजीकच्या असलेल्या एल अँड एल इमारतीच्या खाली पार्क करण्यात आलेल्या गॅरेजमध्ये आग लागण्याची घटना घडली. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास मडगाव अग्निशामक दलाला कॉल आला. त्यांनी आग आटोक्यात आणली. या आगीत फॅन्सिओ फर्नांडिस यांची एक कार व एक बुलेट आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

**कचरा व्यवस्थापनात पालिका फेल : साविओ कुतिन्हो**

मडगाव पालिका कचरा व्यवस्थापनात पूर्णत: अपयशी ठरलेली आहे, असे शॅडो कौन्सिल फॉर मडगावचे साविओ कुतिन्हो यांनी सांगितले.

आगीमुळे स्वच्छतागृहाच्या वीजवाहिनीला आग लागली. त्यासाठी वीज कर्मचारी ट्रान्स्फॉर्मर बंद करण्यासाठी आले असता कचऱ्याच्या ढिगामुळे त्यांना त्याठिकाणी जाण्यास वाट मिळाली नाही.

**कामिलचा पालिकेला घरचा आहेर**

पालिकेपासून अवघ्या १०० मीटरवर कचऱ्याचे ढीग असून त्याला आग लागली हे दुर्दैव आहे. हे पालिका मंडळ बदलेल त्याचवेळी मडगावात हा बदल दिसून येईल. भाजपकडून संधी मिळाल्यास पद स्वीकारु व हा प्रश्न नक्कीच सोडवू, असेही नगरसेवक कामिल बार्रेटो यांनी सांगितले.

# वीज घोटाळा; आठ साक्षीदारांना उपस्थित राहण्यासाठी समन्स

## पुढील सुनावणी ९ फेब्रुवारीला

प्रतिनिधी । गोवन वार्ता

**मडगाव :** वीज घोटाळाप्रकरणी न्यायालयाकडून आठ साक्षीदारांना पुढील सुनावणीवेळी उपस्थित राहण्यासाठी समन्स जारी करण्यात आले. याशिवाय सरकारी वकिलांनी साक्षीदार पडताळणी कार्यक्रमाची रुपरेषा सादर केली. याप्रकरणी पुढील सुनावणी ९ रोजी होणार आहे.

वीज घोटाळाप्रकरणी दक्षिण गोवा जिल्हा विशेष न्यायालयात शुक्रवारी सुनावणी झाली. या प्रकरणातून मंत्री मॉविन गुदिन्हो यांना कायमस्वरुपी अनुपस्थित राहण्याची सूट मिळाली आहे. त्यामुळे शुक्रवारी झालेल्या सुनावणीला ते उपस्थित नव्हते. संशयित राधाकृष्ण हे अनुपस्थित राहत असल्याने न्यायालयाकडून हमीदाराला नोटीस जारी करण्यात आल्यानंतर संशयित राधाकृष्ण बुधवारच्या सुनावणीला उपस्थित राहिले होते. पण शुक्रवारच्या सुनावणीला पुन्हा अनुपस्थित होते. केवळ संशयित टी. नागराजन उपस्थित होते. याशिवाय एका संशयित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

याआधीच्या सुनावणीला साक्षीदार राजेंद्र मदियाल यांचा जबाब नोंदवण्यात आला होता. तर याप्रकरणी एका संशयिताला बेलेबल वॉरंट जारी करत उपस्थित राहण्यास सांगण्यात आले होते पण, पुरेशा वेळेअभावी ते वॉरंट मागे आल्याचे सांगण्यात आले. न्यायालयाकडून उर्वरित साक्षीदारांना उपस्थित राहण्यासाठी समन्स बजावण्यासाठी सुनावणीचा साक्षीदार पडताळणी कार्यक्रमाची रुपरेषा सादर करण्याचे निर्देश सरकारी वकिलांना दिले होते. त्यानुसार ते न्यायालयासमोर सादर करण्यात आले. याप्रकरणी पुढील सुनावणी ९ फेब्रुवारीला सकाळी १० वा. होणार आहे. यासाठी आठ साक्षीदारांना उपस्थित राहण्याचे समन्स जारी केले आहेत.



रिवण येथे गोदामाला लागलेली आग आटोक्यात आणताना अग्निशामक दलाचा जवान.

## रिवण सांगे बाजारात दुकानाच्या गोदामाला आग

प्रतिनिधी। गोवन वार्ता

**केपे :** रिवण सांगे बाजारातील नागेश प्रभूदेसाई यांच्या दुकानाच्या गोदामाला आग लागून सुमारे ३ लाख रुपयांचे नुकसान झाले. कुडचडे अग्निशामक दलाकडून मिळालेल्या माहितीनुसार, शेतात लावलेल्या आगीच्या ठिणग्यांमुळे ही आग लागल्याचा अंदाज आहे. ही घटना शुक्रवारी दुपारी १.३० वाजण्याच्या दरम्यान घडली. गोदामात सुपारी, काजू, कार्डबोर्ड व इतर साहित्य होते. कुडचडे अग्निशामक दलाकडून आग आटोक्यात आणण्यात आली.

# महिलेच्या सतर्कतेमुळे फसला मंगळसूत्र चोरण्याचा डाव

प्रतिनिधी। गोवन वार्ता

**वास्को :** एका ज्येष्ठ महिलेच्या सतर्कतेमुळे दोन अज्ञात चोरट्यांना तिच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावता आले नाही. याप्रकरणी वास्को पोलीस स्थानकामध्ये तक्रार नोंद झाली आहे. चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तेथील सीसीटिव्ही फुटेज तपासण्यास आरंभ केला आहे. दोन दुचाकींवर चार चोर आले असल्याचा दावा त्या महिलेने केला.

चिखलीहून फोंड्याला जाण्यासाठी ही महिला चिखली चौकातील बसथांब्यावर उभी होती. त्यावेळी दुचाकीने आलेले दोघे तिच्याजवळ थांबले. त्या व्यक्तींपैकी एकाने तिला पत्ता विचारला. त्यावेळी ती त्यांच्याशी काहीतरी बोलल्यावर ते दोघे निघून गेले. त्यानंतर थोड्या वेळाने आणखी दोन व्यक्ती दुचाकीने तेथे



आल्या. ते महिलेच्या अगदी जवळ आल्यावर ती थोडीशी बाजूला झाली. त्याचवेळी त्या व्यक्तींपैकी एकाने तिचा दंड घट्ट पकडून मंगळसूत्राला हात घालण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या महिलेने आपल्याकडे असलेली पिशवी खाली टाकून मंगळसूत्र

एका हाताने घट्ट पकडले. त्या चोरट्याने मंगळसूत्र खेचण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या महिलेने ते घट्ट पकडल्याने त्यांचा प्रयत्न फसला. ते दुचाकीवरून तेथून पसार झाले. याप्रकरणी वास्को पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# पणजी पोलीस ठाणे हल्लाप्रकरणी सुनावणीला साक्षीदार अनुपस्थित

प्रतिनिधी। गोवन वार्ता

**मडगाव :** पणजी पोलीस स्थानकावरील हल्लाप्रकरणी तत्कालीन पोलीस उपअधीक्षक मोहन नाईक यांची साक्ष नोंदवण्यास सुरुवात झाली होती. शुक्रवारच्या सुनावणीला साक्षीदार अनुपस्थित होते. त्यामुळे पुढील सुनावणी १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

**संशयित कृष्णा शिरोडकर यांनी पासपोर्ट नूतनीकरण करण्यासाठी न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी १६ फेब्रुवारी रोजी दुपारी २.३० वाजता होणार आहे.**

मंत्री बाबूश मोन्सेरात यांच्यासह इतरांविरोधात पणजी पोलीस स्थानकावर हल्ला प्रकरणी सुनावणी दक्षिण गोवा जिल्हा विशेष न्यायालयात सुरू आहे. बाबूश व जेनिफर मोन्सेरात यांना सुनावणीला अनुपस्थित राहण्यासाठी ३१ मार्चपर्यंत सूट देण्यात आली आहे. बुधवारच्या सुनावणीला २४ संशयित उपस्थित होते तर, ८ संशयित अनुपस्थित होते. बाबूश मोन्सेरात यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी १९ फेब्रुवारी २००८ मध्ये पणजी पोलीस ठाण्यावर हल्ला केल्याप्रकरणी सुनावणीवेळी याआधी तत्कालिन पोलीस निरीक्षक नाईक यांची साक्ष नोंदवण्यात आली. ब्रायन गुदिन्हो याच्यावरील हल्ल्यात सहभागींवर कारवाई करण्याची मागणी करत बाबूश यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ८०० जणांचा जमाव पोलीस ठाण्यावर आला. बाबूश यांनी नेतृत्व करताना चिथावणीखोर वक्तव्ये केल्याचे त्यांनी सांगितले होते. तर तत्कालिन पोलीस उपअधीक्षक मोहन नाईक यांनीही बाबूश यांच्या चिथावणीखोर वक्तव्यानंतर संतप्त जमावाने पोलीस ठाण्यावर हल्ला केल्याचे सांगितले. त्यानंतर काहीवेळात पणजी पोलीस ठाण्यावर मोर्चा आणून दबाव टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यावेळी बाबूश यांच्या वक्तव्यांमुळे जमाव संतप्त झाला. जमावाला हटवण्यासाठी सुरुवातीला अश्रुधुराच्या बाटल्या फोडल्या. त्यानंतर हवेत गोळीबारही केला. तरीही जमाव न पांगल्याने लाठीचार्ज करण्यात आला. त्यावेळी जमावातील लोक पळाले, पण काहीवेळाने पुन्हा एकत्र आले. त्यानंतर जमावाने पोलीस ठाण्यावर बॉटल्स व दगडफेक केली. या हल्ल्यात ४५ पोलीस कर्मचारी जखमी झाले व त्यांना गोमेकॉत दाखल करण्यात आल्याचे नाईक यांनी मागील सुनावणीवेळी सांगितले होते. शुक्रवारी झालेल्या सुनावणीवेळी साक्षीदार नाईक यांचा जबाब नोंदवणे पुढे सुरू राहणार होते पण, ते सुनावणीला अनुपस्थित होते.

## लक्षवेधी

### बागा - हडफडेतील छापा; ५.४५ लाखांचा ड्रग्ज जप्त

**गोवन वार्ता। म्हापसा :** हडफडे-बागा येथे हणजूण पोलिसांनी छापा टाकून ५.४५ लाखांचा ५५.६६ ग्रॅम हेरॉईन ड्रग्ज जप्त केला. संशयित आरोपी सुरेश अशोक काळे (३७, रा. सोलापूर) व सुबान हैदर शेख (४५, रा. सुबरबान मुंबई) या दोघांना अटक केली. ही कारवाई पोलिसांनी गुरुवारी संध्याकाळी ५.४५ ते ७.५० च्या दरम्यान केली. बागा - हडफडे येथे बागा खाडीजवळील चॅपेल परिसरात ड्रग्जचा विक्री व्यवहार होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार घटनास्थळी पोलिसांनी सापळा रचला. वरील दोघेही संशयित आरोपी ड्रग्जचा विक्री व्यवहार करत असताना पोलिसांनी छापा टाकून दोघानांही पकडले व ताब्यात घेतले.

# बार्देशमध्ये चार वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार

• **सुरक्षारक्षक प्रकाश कुमारला अटक**

प्रतिनिधी। गोवन वार्ता

**म्हापसा :** बार्देश तालुक्यातील एका बांधकाम साईडच्या सुरक्षा रक्षकाकडून तेथील मजुराच्या चार वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला. संशयित आरोपी प्रकाश कुमार (४५, बिहार) याला पोलिसांनी अटक केली आहे.

ही घटना १ फेब्रुवारी रोजी घडली. खेळत असलेल्या मुलीला संशयिताने बिस्कीट देण्याचे आमिष दाखवून आपल्याकडे बोलावले. नंतर तिला मारहाण करीत तिच्यावर लैंगिक अत्याचार केले.

मुलीचा चेहरा सुजल्याचे तिच्या पालकांच्या लक्षात येताच त्यांनी मुलीला सरकारी इस्पितळात दाखल केले. तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे उघडकीस आले. त्यानुसार इस्पितळाच्या डॉक्टरांनी पोलिसांना याची कल्पना दिली. पोलिसांनी लगेच चौकशी करून संशयितास ताब्यात घेतले. पोलिसांनी संशयिताविरूद्ध भा.दं. सं.चे कलम ३६३, ३७६, ३५४, ३५४ (अ), ३२४ तसेच गोवा बाल कायदा आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा नोंद केला आहे. दरम्यान, गोमेकॉत पीडित मुलीची वैद्यकीय चाचणी करण्यात आली. पोलीस या अहवालाची प्रतिक्षा करत असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक यशवंत मांद्रेकर करीत आहेत.

# कंपनीची फ्रँचाईजी देण्याचे आमिष; आस्थापनाला ४२.५८ लाखांचा गंडा

## पणजी पोलिसांकडून गुरगावातील दोघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । गोवन वार्ता

**पणजी :** क्लीन्झ २४ ची फ्रँचाईजी देण्याचे आमिष दाखवून पणजीतील एका आस्थापनाला ४२.५८ लाख रुपयाचा गंडा घालण्यात आला. या प्रकरणी पणजी पोलिसांनी गुरगाव येथील निकट्टम सोल्युशन प्रा. लि. चे सोमनाथ रावत्रेय आणि राज नायक यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पणजी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी टोंक - करंझाळे येथील सिद्धीविनायक फॅब्रिक केअरचे अमित कुमार दुबले यांनी तक्रार दाखल केली




आहे. त्यानुसार, १ मार्च २०२३ ते २९ एप्रिल २०२३ दरम्यान क्लीन्झ २४ ची फ्रँचाईजी देण्याचे आमिष दाखवून तक्रारदार आणि संशयिताच्या कंपनीमध्ये करार करण्यात आला होता. त्यासाठी तक्रारदाराला ३४ लाख ८ हजार ५०० रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडले. त्यानुसार, तक्रारदाराने ८.५० लाख खर्च करून कंपनीच्या आवश्यकतेनुसार शोरुमसाठी फॅब्रिकेशन व इतर दुरुस्ती केली. त्यासाठी कंपनीचे अभियंता अनुभव त्यागी यांनी सूचना दिल्या. त्यानंतर कंपनीने क्लीन्झ २४ ची फ्रँचाईजी दिली नाही तसेच तक्रारदारांची रक्कम परत केली नाही. यामुळे पोलीस स्थानकात तक्रार दाखल करण्यात आली. याची दखल घेऊन पणजी पोलीस निरीक्षक निखिल पालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मयूर पणशीकर यांनी वरील कंपनीचे सोमनाथ रावत्रेय आणि राज नायक यांच्या विरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० आणि आरडब्ल्यू ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

# दीड लाखाच्या दागिन्यांची चोरी; सासूची सुनेविरोधात पोलिसांत धाव

प्रतिनिधी । गोवन वार्ता

**पणजी :** सुनेने आपले १.५ लाख रुपये किमतीचे दागिने चोरी केल्याची तक्रार सासूने जुने गोवा पोलीस स्थानकात दाखल केली आहे. याची दखल घेऊन जुने गोवा पोलिसांनी वैभवी जॉर्ज हिच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

जुने गोवा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी संगीता जॉर्ज यांनी पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार, संशयित सून वैभवी जॉर्ज ५ नोव्हेंबर २०२२ ते ९ नोव्हेंबर २०२२ दरम्यान आपल्या घरी रायबंदर येथे रहायला आली होती. त्यावेळी तिने आपले १.५ लाख रुपये किमतीची एक अंगठी आणि एक जोडी कर्णफुले

**संशयित वैभवी जॉर्ज घरगुती छळ व इतर प्रकारामुळे १० नोव्हेंबर २०२२ पासून मुंबईत राहत असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच संशयित वैभवी जॉर्ज यांनी पती व त्यांच्या कुटुंबीयांविरोधात मार्च २०२३ मध्ये मुंबईत घरगुती छळ प्रकरणी गुन्हा दाखल केल्याची माहिती समोर आली आहे.**


चोरी केल्याचे म्हटले आहे. याची दखल घेऊन जुने गोवा पोलीस निरीक्षक योगेश सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उपनिरीक्षक रॅकेल डायस यांनी संशयित वैभवी जॉर्ज हिच्या विरोधात भादंसंच्या कलम ३८० अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# खा. विनायक राऊत यांचाच विजय निश्चित

## विभागवार निर्धार मेळावे घेणार : युवा सेना जिल्हाप्रमुख मंदार शिरसाट

कोकणसाद वृत्तसेवा

**कुडाळ** : गेल्या १० वर्षाच्या कालावधीत विद्यमान खासदार विनायक राऊत यांनी रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात कार्य केले असून आता होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत खा. राऊत यांचाच विजय होणार असून युवासेनेच्या माध्यमातून खा. राऊत यांच्या विजयासाठी विभागवार निर्धार मेळावे घेणार असल्याची माहिती उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे सिंधुदुर्ग युवासेना जिल्हा प्रमुख मंदार शिरसाट यांनी पत्रकार परिषदेत दिली.



कुडाळ येथे बोलताना मंदार शिरसाट. सोबत योगेश धुरी, मदन राणे, सागर भोगटे, स्वप्नील शिंदे, विनय गावडे, संदीप महाडेश्वर, अमित राणे, रोहित सावंत, मुकेश पालव, गुरु गडेकर आदी.

कुडाळ येथे युवासेना पदाधिकाऱ्यांची मंदार शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीनंतर मंदार शिरसाट यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी युवासेनेचे कुडाळ तालुकाप्रमुख योगेश धुरी, नगरसेवक उदय मांजरेकर, युवासेना दोडामार्ग तालुकाप्रमुख मदन राणे, युवासेना उपतालुका प्रमुख सागर भोगटे, स्वप्नील शिंदे, विनय गावडे, युवासेना शहर प्रमुख संदीप महाडेश्वर, शहर समन्वयक अमित राणे, रोहित सावंत, मुकेश पालव, गुरु गडेकर, संदेश सावंत, प्रथमेश सावंत, विनय पालकर आदी उपस्थित होते.

यावेळी शिरसाट यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुका लवकरच होणार आहेत, आमच्या पक्षाकडून विद्यमान खा. राऊत यांना उमेदवारी जाहीर झालेली आहे. खा. राऊत यांचा विजय निश्चित आहे. युवासेनेच्या माध्यमातून आम्ही आतापासूनच प्रचार सुरू केला आहे. गेल्या १० वर्षात खा. राऊत यांनी केलेल्या विकास कामांचे पत्रक काढले असून ते जनतेपर्यंत पोहचविणार आहोत. तसेच विभागवार निर्धार मेळावे घेणार आहोत.

युवासेनेच्या माध्यमातून पदवीधर मतदार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या जिल्ह्यात जास्तीत जास्त विक्रमी पदवीधर नोंदणी केली असून, खा. राऊत, आमदार वैभव नाईक, जिल्हा संपर्क प्रमुख अरूण दुधवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना खा. राऊत यांच्या विजयासाठी मोठ्या प्रमाणात मेहनत घेणार असल्याचे सांगितले.

राज्यात मोठ्या प्रमाणात तलाठी भरती होणार आहे. मात्र परीक्षा केंद्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात नाही, या विरोधात योगेश धुरी यांनी आवाज उठविला आहे, आता याच पार्श्वभूमीवर केवळ तलाठीच नव्हे तर आगामी होणार्या सर्व सरकारी नोकरी भरतीची परिक्षा केंद्रे सिंधुदुर्ग जिल्ह्यात झाली पाहीजेत या करीता युवासेना तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा ही शिरसाट यांनी दिला.

४ जानेवारी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे सिंधुदुर्ग जिल्हा दौऱ्यावर येत असून यावेळी युवासेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे शिरसाट यांनी सांगितले.

# रंगोत्सव आंतरराष्ट्रीय स्पर्धेत वळीवंडे प्राथमिक शाळेचे यश

कोकणसाद वृत्तसेवा

**देवगडः** तालुक्यातील वळीवंडे येथील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा वळीवंडे नं.१ च्या विद्यार्थ्यांनी रंगोत्सव या आंतराष्ट्रीय स्पर्धेमध्ये विशेष प्राविण्य मिळविले असून त्याची दखल आंतराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. या स्पर्धेत मिळवलेली पारितोषिके अनुक्रमे 2 spectacular performance award आणि ७ मेडल्स मुलांना मिळाली, तसेच रंगोत्सव राष्ट्रीय २०२३-२४ मध्ये तर १ कला मेरीट ट्रॉफी, १८ गोल्ड मेडल, ५ ब्रॉंझ मेडल, २ सरप्राईज गिफ्ट इत्यादी पारितोषिके मिळाली आहेत, तर त्यामध्ये २३ विद्यार्थ्यांची यावेळी इंटरनॅशनल स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

STS स्पर्धेत १ सिल्वर मेडल, २ ब्रॉंझ मेडल तर अध्ययन संस्था आयोजित मापन २ ऑलम्पिक स्पर्धेत प्रथम क्रमांक त्याच बरोबर सिंधुदुर्ग जिल्हा परिषद आयोजित कला क्रीडा व ज्ञानी मी होणार या स्पर्धेत देखील विविध क्रीडा प्रकारात घवघवीत यश मिळाले आहे. त्याचबरोबर शाळेसाठी Best performing school in the world award मिळाला आहे. आणि Icon Award मिळाले आहेत. तसेच मुख्याध्यापक मालंडकर यांना Leader of excellence in cultural activities Award मिळाला आहे. यावेळी सहा. शिक्षक कोळी यांना कलाभूषण ॲवॉर्ड मिळाला आहे. यावेळी विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते. मुख्याध्यापिका श्रीम. रश्मीगंधा मालंडकर, सहकारी शिक्षक श्रीम. मयुरी सैतवडेकर, श्रीम. संगीता वाघमोरे, चिदानंद कोळी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विरेंद्र सावंत यावेळी उपस्थित होते.

# उद्धव ठाकरेंच्या कोकण दौऱ्याने दिवट्या - पावट्यांना पोटशूळ : सरवणकर

**वैभववाडीः** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव उद्धव ठाकरे यांचा कोकण दौरा अनेकांच्या जिव्हारी लागला आहे. जिल्ह्यातील दिवट्या व पावट्यांना त्याचा पोटशूळ आला आहे, अशी टीका ठाकरे शिवसेनेचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य संदीप सरवणकर यांनी विरोधकांवर केली आहे.

उद्धव ठाकरे ४ व ५ फेब्रुवारीला सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या या दौऱ्यावर विरोधकांनी जोरदार टीका केली आहे. याला सरवणकर यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे. ठाकरे यांच्या दौऱ्याची विरोधकांनी धास्ती घेतली आहे. त्यामुळेच त्यांची निरर्थक बडबड सुरु आहे. राज्यात गेल्या दीड-दोन वर्षांपासून कायदा सुव्यवस्था राहिली नाही आहे. राज्याचे बिहारीकरण होत आहे. सत्ताधारी सर्व स्तरावर अपयशी ठरत आहेत. त्यामुळे विरोधकांना ईडी, सीबीआय यांचा धाक दाखवून संपविण्याचा घाट घातला आहे.या सर्वाला उद्धव ठाकरे पुरून उरले आहेत. त्यांना रोखण्यासाठी भाजपाने सर्व पर्याय करून बघितले. मात्र ते नमत नसल्याने विरोधक वैफल्यग्रस्त झाले आहेत.

शिवसेना फुटीनंतर पक्ष संपेल असे भाजपाला वाटत होते. मात्र त्यानंतरही ठाकरेंना जनतेचा मोठा पाठिंबा मिळत आहे. हे पाहूनच शिंदे गटात पळून गेलेले व भाजपा यांची पायाखालची जमीन सरकली. कोकण दौऱ्यावर ठाकरे यांना जनतेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कोकणी जनता ठाकरे शिवसेनेच्या बाजूने असल्याने विरोधक धास्तावले आहेत. त्यामुळेच ते अशी वक्तव्ये करीत आहेत अशी टीका सरवणकर यांनी केली.

उद्धव ठाकरेंनी कोकणाला काय दिले म्हणून विचारणाऱ्या केसरकर व राणेंनी स्वतः जिल्ह्यांसाठी केले ते आधी सांगावे, असा सवाल त्यांनी केला.

# दोडामार्ग तालुक्यात एसटी सेवेचा बोजवारा

**ठाकरे सेना आक्रमक**

कोकणसाद वृत्तसेवा

■ बाबुराव धुरी यांच्या नेतृत्वाखाली आगार व्यवस्थापकांना विचारला जाब

**दोडामार्गः** तालुका उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्यावतीने शुक्रवारी सावंतवाडी एस. टी. आगार प्रमुख निलेश गावित व शेवाळे यांची भेट घेऊन दोडामार्ग आगारातून वेळेत न सुटणाऱ्या बस व बंद करण्यात आलेल्या एस. टी फेऱ्या पूर्ववत सुरु करण्याची मागणी केली आहे.

तालुक्यातील विर्डी, पिकुळे, मांगेली, पाळये, सोनावल या एसटी बस बंद करण्यात आल्या आहेत. त्या त्वरित चालू करण्याबाबत, तसेच सावंतवाडी-पाळये ही बस शौचालय, बाथरूमची सोय नसल्याने पाळये गावातील गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू असलेली वस्तीची बस फेरी पाळये येथून मेढे ग्रामपंचायत येथे स्थलांतरित करण्यात आलीय. ती बस तात्पुरती सावंतवाडी पाळये व्हाया मेढे अशी करावी, अशी विनंतीही यावेळी करण्यात आली. ही विनंती आगारप्रमुख यांनी मान्य केली असून, शुक्रवारपासून पाळये गावात सदर फेरी पूर्ववत सुरू करतो, असे आश्वासन देण्यात आले आहे. तर बंद करण्यात आलेल्या अन्य बस फेऱ्यांसंदर्भात येत्या आठ दिवसांत शिवसेना पदाधिकारी व एस.टी. चे अधिकारी यांची संयुक्त बैठक लावून निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले आहे.





आगार व्यवस्थापक यांना दोडामार्गची भौगोलिदृष्ट्या माहिती देऊन येथे एस. टी. सेवा सुरळीत देण्याबाबत माहिती देताना बाबुराव धुरी व ठाकरे सेनेचे पदाधिकारी.

यावेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख बाबुराव धुरी, उपतालुका संघटक संदेश वरक महिला तालुका प्रमुख श्रेयाली गवस, सुनील गवस, दीपक जाधव, बाबा खतीब व शिवसैनिक उपस्थित होते.

# दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा सवलतीचे गुण मिळण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

कोकणसाद वृत्तसेवा

**सिंधुदुर्गनगरी** : सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये स्टेट बोर्ड अंतर्गत असलेल्या शाळेतील इ.१० वी व इ.१२ वीमधील खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण मिळण्यासाठीचे प्रस्ताव शालेयस्तरावरून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात ५ एप्रिलपर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस यांनी केले आहे.

खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे गुणांचे प्रस्ताव सादर करणेबाबतचे कव्हरींग पत्र. शासकीय / संघटनेच्या जिल्हा/विभाग/राज्य/राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत क्रीडा गुण सवलत मिळण्यासाठी खेळाडू विद्यार्थ्यांची यादी. प्रपत्र १ ग्रेस मार्क मिळण्यासाठी करावयाचा अर्जाचा विहित नमुना- शासकीय स्पर्धा. प्रपत्र २- ग्रेस मार्क मिळण्यासाठी करावयाचा अर्जाचा विहित नमुना मान्यता प्राप्त एकविध खेळ संघटना स्पर्धा.

खेळाडू विद्यार्थ्यांचे प्राविण्य/सहभाग प्रमाणपत्राची साक्षांकित झेरॉक्स प्रत. खेळाडू विद्यार्थी हॉल तिकीट झेरॉक्स प्रत. (टीप- बैठक क्रमांक चुकल्यास संबंधित शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय जबाबदार राहील) प्रपत्र ३- जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या क्रीडा सवलतीचे गुणबाबतचे शिफारस प्रमाणपत्र. (फॉर्म मधील क्र. १ ते ९ ची माहिती शाळेने भरावयाची आहे.) (उर्वरीत माहिती कार्यालयामार्फत भरण्यात येणार आहे.) विभागीय मंडळाकडे छाननी शुल्क भरणा केलेल्या चलनाची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

क्रीडा सवलत गुण मिळण्यासाठी पात्र खेळ : आर्चरी, बॅडमिंटन, बास्केटबॉल, सायकलिंग, फुटबॉल, हँडबॉल, ज्युदो, लॉन टेनिस, टेबल टेनिस, जलतरण, कबड्डी, बेसबॉल, कराटे, वुशु, सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल, सेपक टकरा, सॉफ्ट टेनिस, मल्लखांब, बॉल बॅडमिंटन, बुद्धिबळ, थ्रोबॉल, योगासन, सिकई मार्शल आर्ट्स, डॉजबॉल, टेनिक्वाईट, ॲथलेटीक्स, बेटलिफ्टिंग, बॉक्सिंग, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, व्हॉलीबॉल, रायफल शुटिंग, तायक्वांदो, कुस्ती, सॉफ्टबॉल, नेटबॉल, स्क्वॅश, नेहरू कप हॉकी, रग्बी, मॉडर्न पेंटेथलॉन, खो-खो, कॅरम, क्रिकेट, रोलर स्केटिंग/हॉकी, किक बॉक्सिंग, रोल बॉल, शूटिंग बॉल, आट्यापाट्या.

जिल्ह्यातील शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलत गुणांचे परिपूर्ण प्रस्ताव (प्रत्येक खेळाडूसाठी स्वतंत्र प्रस्ताव) तयार करून दोन प्रतीत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे दि.५ एप्रिल २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे, विहित मुदतीनंतरचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

# विविध स्पर्धांत आरवली-टांक सरस्वती विद्यालयाचे यश

कोकणसाद वृत्तसेवा

**वेंगुर्ले** : येथील नगरवाचनालय संस्थेच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांत श्री सरस्वती विद्यालय, आरवली टांक प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

वेंगुर्ले नगरवाचनालयात संपन्न झालेल्या ५ वी ते ७ वी या शालेय गटात पूर्वा बापू भानजी उत्तेजनार्थ तसेच ८ वी ते १० वी गटात ज्ञानेश्वरी बारावा अध्याय १ ते १५ ओव्या पठन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत या प्रशालेची नववीच्या वर्गातील प्राची संतोष कावळे हिने प्रथम क्रमांक तर स्नेहल संतोष भुबे हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तर वक्तृत्व स्पर्धेत युगनायक स्वामी विवेकानंद या विषयावर व्यक्त होणारी दीप्ती तिमाजी गवसकर ही या वक्तृत्व स्पर्धेतील प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. याच ठिकाणी संपन्न झालेल्या स्वा. सावरकरांची सामाजिक समरसता या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत गौरी शेखर तिरोडकर हिला उत्तेजनार्थ क्रमांक १ व अलिशा घन:श्याम गोडकर हिला उत्तेजनार्थ क्रमांक २ मिळाला.



विविध स्पर्धांत यशस्वी ठरलेल्या आरवली टांक सरस्वती विद्यालयाच्या विद्यार्थिनी.

या सर्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण वेंगुर्ले-नगर वाचनालयाच्या लक्ष्मीबाई कोरगावकर सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या विविध स्पर्धांत सहभागी झालेल्या स्पर्धेतील सर्व विजेत्यांना श्रीम. देवयानी झोरे, श्रीम. निकिता वालावलकर व श्रीम. श्रद्धा नाईक यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल श्री सरस्वती विद्यालय, आरवली टांक हायस्कूलचे मुख्याध्यापक एम. एल. जाधव, संस्था सचिव उमेश सुकी, सहसचिव मंगेश कांबळी तसेच पदाधिकारी प्रदीप प्रभू आणि सर्व पदाधिकारी, शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी यांनी या स्पर्धेचे विजेते ठरलेले सर्व यशस्वी विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षक यांचे विशेष अभिनंदन केले. श्री सरस्वती विद्यालय आरवली टांकच्या विद्यार्थ्यांनी नगरवाचनालयातील झालेल्या विविध स्पर्धांत केलेल्या दमदार कामगिरीचे विविध स्तरांवर कौतुक केले जात असून यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शिंदे गटाचे अस्तित्व विचारणारे वैभव नाईक, पडते वैफल्यग्रस्त

■ रुपेश पावसकरांचा प्रत्यारोप

■ डावे-उजवे आपल्या संपर्कात असल्याचा दावा

कोकणसाद वृत्तसेवा

**कुडाळ** : शिंदे गटाचे अस्तित्व नाही, असे वक्तव्य करणारे आमदार वैभव नाईक



आणि संजय पडते हे दोघे 'वैफल्यग्रस्त' झाले आहेत. आपल्या पक्षातील कार्यकर्ते सांभाळू शकले नसल्यामुळे ते टीका करत सुटले आहेत, असा टोला शिवसेनेचे जिल्हा संघटक रुपेश पावसकर यांनी लगावला आहे. कुणीतरी लिहून दिलेले बोलायचे आणि त्यावर मिरवायचे ही आमदार नाईक यांची जुनी पद्धत आहे. मात्र त्यांनी असे करण्यापूर्वी आपल्या बाजूचे डावे-उजवे आमच्या संपर्कात आहेत, हे विसरू नये, असे त्यांनी म्हटले आहे.

नाईक व पडते यांनी पत्रकार परिषद घेऊन शिवसेना नेत्यावर टीका केली. याला पावस्कर यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले की, वैभव नाईक हे वैफल्यग्रस्त झाले आहेत. तसेच ते आपल्या पक्षातील कार्यकर्त्यांना सांभाळू शकत नाहीत. यामुळे ते असे बेताल वक्तव्य करत आहेत. आमच्या शिंदे शिवसेनेत मोठ्या प्रमाणावर असंख्य कार्यकर्ते प्रवेश करत आहेत. हे सर्व ठाकरे गटाचे कार्यकर्ते आहेत. त्यामुळे वैभव नाईक यांनी आपले आत्मपरीक्षण करावे. तसेच पक्षातील गळती ते थांबवू शकले नाहीत हे त्यांचे अपयश आहे. त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत आमचा उमेदवार हा ३ लाख एवढे मताधिक्य घेऊन निवडून येईल. त्याचप्रमाणे आमचे मंत्री दीपक केसरकर हे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासासाठी नेहमीच कटिबद्ध आहेत. त्यांनी जिल्ह्याचा आराखडा १९० कोटी एवढा भरीव केला. जिल्ह्यात काथ्या उद्योगसारखे प्रकल्प हे दीपक केसरकर यांनी आणलेत. दीपक केसरकर यांनी बोलण्याचा नैतिक अधिकार वैभव नाईक यांना नाही. शिंदे गटाचा भव्य मेळावा हा सिंधुदुर्ग-रत्नागिरी जिल्ह्याच्या मध्यभागी म्हणजेच राजापूर येथे राजीव गांधी मैदान येथे झाला. यावेळी बोलताना संजय पडते हे देखील बोलले की, खासदार विनायक राऊत हे वैयक्तिक मदत करतात. त्यांनी किती लोकांना मदत वैयक्तिक मदत केली ते जाहीर करावे. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना शिंदे यांचे नेतृत्व मान्य असल्याने शिवसेना पक्षात मोठ्या प्रमाणावर ठाकरे गटाचे कार्यकर्ते प्रवेश करीत आहेत, असेही रुपेश पावसकर म्हणाले.

# जामसंडे येथे आज स्वानंद योग फाऊंडेशन कोर्स

कोकणसाद वृत्तसेवा

**देवगड** : देवगड-जामसंडे येथे ४ फेब्रुवारी रोजी सद्गुरु वामनराव पै यांच्या जीवन विद्या मिशनतर्फे जीवन विद्येची ओळख करून देणारा स्वानंद योग लेवल वन फाऊंडेशन कोर्स सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.३० वा जामसंडे येथील सांस्कृतिक भवनात आयोजित करण्यात आला आहे.

नैसर्गिक पद्धतशीर सुंदर व्यवस्था म्हणजे आपले शरीर, त्याच्याकडे पाहण्याची दृष्टी कशी हवी? मन म्हणजे काय? मनासारखे घडवण्यासाठी, मनाला सारखे करण्यासाठी युक्ती कोणती, ऐश्वर्यसंपन्न जीवनाचा आनंदासाठी किती आणि कोणते धन लागते? या सर्व प्रश्नांची उत्तरे या कोर्समध्ये मिळतील. याचा आपल्या जीवनातील सुख-दुःखाशी नेमका संबंध काय? तन-मन धन हे जाणून घेण्यासाठी या कोर्समध्ये आवश्यक उपस्थित रहा, असे आवाहन जीवन विद्या मिशनच्यावतीने कृष्णा मंचेकर, शामसुंदर सनये, राजन मोंडकर, आत्माराम कोयंडे यांनी केले आहे.

■ उपाध्यक्षपदी दिलीप भालेकर यांची निवड

# भाजप ओबीसी महासंघ जिल्हाध्यक्षपदी आनंद मेस्त्री

कोकणसाद वृत्तसेवा

**सावंतवाडी** : सिंधुदुर्ग जिल्ह्याची भाजप ओबीसी महासंघाची कार्यकारणी शनिवारी जाहीर करण्यात आली असून यावेळी जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी आनंद मेस्त्री तर उपाध्यक्षपदी दिलीप भालेकर यांच्यासह नऊ जणांची निवड करण्यात आली आहे.

यावेळी भाजप नेते राजन तेली यांच्या उपस्थितीत ही पत्रकार परिषद घेऊन ही कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, ओबीसी समाजाला भेडसावणारा प्रश्न भाजपच्या माध्यमातून सोडवण्याचा आमचा प्रयत्न असून त्यामुळे लवकरच जिल्ह्यात मोठा मेळावा देखील घेतला जाईल, अशी



आनंद मेस्त्री, दिलीप भालेकर यांना नियुक्तीचे पत्र देताना भाजपचे नेते राजन तेली. सोबत इतर मान्यवर.

माहिती देखील यावेळी नवनिर्वाचित ओबीसी जिल्हाध्यक्ष आनंद मेस्त्री यांनी यावेळी दिली.

यावेळी माजी नगरसेवक आनंद नेवगी, बाळा आकेरकर, दीपक काणेकर, विकी केरकर आदी भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपाध्यक्षपदी सिद्धार्थ भांबुरे, ओंकार तेली, अमोल तेली, राजेंद्र आंबेरकर, नारायण साळवी, अंकुश वेटे, सुरेश ढवळ, शरद मेस्त्री, डॉ. सवेश नारकर, सरचिटणीस शांताराम (बाळा) आकेरकर,भूषण पोकळे, दीपक काणेकर, प्रकाश मेस्त्री, सचिवपदी कृष्णा तांडेल, सुनील मठकर, जगदीश चव्हाण, गाजन्नाथ धुरी, आनंद पांढरे, आनंद नेवगी, शंकर साळगावकर, अक्षय पार्सेकर, प्रवीण नाटेकर, कोशाध्यक्ष रितेश सुतार, महिला संपर्क प्रमुख संध्या परमेकर, युवा संपर्क प्रमुख सुधीर आरिवडेकर, महिला संपर्क प्रमुख लक्ष्मी सडवेलकर, युवक सह संपर्क प्रमुख अनिकेत घोंगडे, सोशल मिडिया संयोजक राम बांदेलकर, वैभव मेस्त्री, संदेश सुकळवाडकर, मनकी बात प्रमुख गणपत दशरोडकर, आनंद मेस्त्री, दिनेश मेस्त्री,कुणाल कुंभार, सदस्यपदी योगेश पाथरे, लक्ष्मण (बाळा) नाईक,संजय विर्नोडकर, माधवी बांदेकर, संदीप हळदणकर, सागर सांगेलकर, शंकर मेस्त्री, समीर कल्याणकर, साईनाथ धारगळकर,अजय परब, श्याम शेटकर, मनोज वाटेगावकर, सचिन खेडेकर,चंद्रशेखर मुळम, नारायण कुंभार, रवींद्र सांगवेकर, रामचंद्र भोई,साक्षी वाळके, विजय भोगटे, राजू पेडणेकर, प्रकाश मुणगेकर आदींची नियुक्ती जाहीर करण्यात आली.



केंद्रीय पदाधिकारी श्रीमती वनिता हरिहरण, प्रदेश समन्वयक श्रीमत आम्रपाली साळवे यांचे स्वागत करताना सावंतवाडी भाजप महिला पदाधिकारी.

# भाजप केंद्रीय पदाधिकारी, प्रदेश समन्वयक यांचे सावंतवाडीत स्वागत

**सावंतवाडी** : भारतीय जनता पक्ष सिंधुदुर्ग जिल्हा 'शक्तीवंदन' अभियानांतर्गत केरळ केंद्रीय पदाधिकारी श्रीमती वनिता हरिहरण व प्रदेश समन्वयक श्रीमती आम्रपाली साळवे या सिंधुदुर्ग जिल्हा दौऱ्यावर आले असताना यावेळी सावंतवाडी भाजप महिला पदाधिकाऱ्यांच्या वतीने रेल्वे स्टेशन येथे त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी महिला जिल्हाध्यक्ष श्वेता कोरगावकर, जिल्हा सरचिटणीस शर्वरी गावकर, जिल्हा चिटणीस मिसबा शेख, तालुका सरचिटणीस प्रियंका गावडे, सावंतवाडी महिला मंडळ अध्यक्ष मोहिनी मडगावकर आदी उपस्थित होत्या.

# सत्तार म्हणाले, 'मी पक्का राजकारणी!'

## हज हाउसच्या लोकार्पणात मिश्कीलपणे उलगडले स्व-व्यक्तिमत्त्व

मी मंदिराचा पुजारी नाही. मशिदीचा पेशइमामही नाही. पक्का राजकारणी आहे. मी खूप छोटा माणूस आहे, बोलण्यास घाबरत नाही. मी अशी चावी आहे, जी कुठल्याही कुलपाला लागते. कुणाच्या पोटात काय, कुणाच्या ओठात काय अन् बटण दाबणाऱ्या बोटात काय याचा अंदाज सहज लावतो, असे मंत्री अब्दूल सत्तार यांनी सांगत खळखळून हसवले. निमित्त होते ते शुक्रवारी झालेल्या हज हाउसच्या लोकार्पणाचे.



छत्रपती संभाजीनगर : मी मंदिराचा पुजारी नाही. मशिदीचा पेशइमामही नाही. पक्का राजकारणी आहे. मी खूप छोटा माणूस आहे, बोलण्यास घाबरत नाही. मी अशी चावी आहे, जी कुठल्याही कुलपाला लागते. कुणाच्या पोटात काय, कुणाच्या ओठात काय अन् बटण दाबणाऱ्या बोटात काय याचा अंदाज सहज लावतो, असे मंत्री अब्दूल सत्तार यांनी सांगत खळखळून हसवले. निमित्त होते ते शुक्रवारी झालेल्या हज हाउसच्या लोकार्पणाचे.

सत्तार म्हणाले, मी ज्या सिल्लोड विधानसभा मतदारसंघातून निवडून येतो, तिथे ३ लाख २० हजार हिंदू आणि ६० हजार मुस्लिम मतदार आहेत. माझ्या विरोधात कायम एक हिंदू आणि दोन मुस्लिम उभे राहतात; तरीही मी पंचवीस-तीस हजार मतांनी जमवूनच घेतो. ज्या शहरात हातगाडी ओढली त्या शहरात आता हेलिकॉप्टरमधून उतरतो. आयएएस अन् आयपीएस अधिकारी मला सॅल्यूट करतात. एकदा खासदार व्हावे म्हणून अशोक चव्हाण यांच्याकडे गेलो. पण, तिकीट मिळाले नाही पुन्हा त्यांच्याकडे गेलो नाही. कुणाची हाजीहाजी करणे मला जमत नाही.

मी कुठल्याही पार्टीत असलो तरीही मला काहीही फरक पडत नाही. म्हणूनच तर काँग्रेसला सोडून इम्तियाज जलील यांना खासदार केले.

सत्तार म्हणाले, मला सभागृहात तत्कालीन अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर भाषण करू दिले; कारण मी मोठा होईल ही भीती त्यांना होती; त्यामुळे माझ्याऐवजी त्यांनी तत्कालीन आमदार इम्तियाज जलील यांना संधी दिली. त्यावर मी बागडे यांना खूप त्रास दिला. नंतर त्यांची माफीही मागितली. काहीच नाही जमले तर कादरखान होऊन काम करून घ्यावे लागते. मी शिकलो नाही. पण, भल्याभल्यांना शिकवतो, असेही ते म्हणाले. दरम्यान, खासदार इम्तियाज यांनी बोलताना छत्रपती संभाजीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळाहून थेट उमरा जाण्यासाठीची व्यवस्था झाली तर शहराच्या विकासात भर पडेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

### संभाजीनगरात होणार अल्पसंख्याक आयुक्तालय

**राज्याचे अल्पसंख्याक आयुक्तालय छत्रपती संभाजीनगरात होणार आहे. नव्याने होणाऱ्या प्रशासकीय इमारतीत या मुख्यालयासह मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ आणि वक्फ बोर्डाचे कार्यालय राहील, असा आशावाद वक्फ मंत्री अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला. शहरातील हज हाउसचे लोकार्पण शुक्रवारी अल्पसंख्याक विकास व पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, खासदार इम्तियाज जलील, आमदार प्रदीप जैस्वाल, हरिभाऊ बागडे, उदयसिंग राजपूत आदींची उपस्थिती होती.**



## हेरवाड हद्दीतील चौगुले मळ्यात ४० एकर ऊस जळून खाक

**कुरुंदवाड :** हेरवाड हद्दीतील चौगुले मळ्यात असणाऱ्या शेती क्षेत्राला अचानक आग लागल्याने परिसरातील सुमारे ४० एकर ऊस जळून खाक झाल्याची घटना आज शनिवारी दुपारच्या सुमारास घडली आहे. या आगीमध्ये शेतकऱ्यांचे ठिबक, केबल वायरिंग यासह पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपा जळाल्याने मोठे नुकसान झाले आहे.

घटनास्थळावरून मिळालेली अधिक माहिती अशी की, येथील चौगुले मळा येथे काही ठिकाणी उसाची तोड सुरू होती. दरम्यान एका क्षेत्राला अचानक आग लागल्याने परिसरातील सुमारे ४० एकर ऊस जळून खाक झाला. या आगीत स्वप्नील चौगुले, रावसाहेब चौगुले, रमेश आलासे, महावीर पाटील, बी.के. पाटील, विजय आलासे, श्रीकांत माळी, अभय आलासे, प्रवीण आलासे, दादा आलासे, बंडू परीट, अंकुश माळी, तुकाराम माळी, सौरभ चौगुले आदी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

## माढ्यात रणजितसिंह निंबाळकर यांना उमेदवारी नकोच

**अकलूज :** माढा लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असताना





उमेदवारी कोणाला मिळणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे परंतु विद्यमान खासदार रणजीतसिंह निंबाळकर यांच्या नावाला कडाडून विरोध होत असताना दिसत आहे पाच वर्षांमध्ये कधीही जनतेमध्ये मिसळले नाहीत की सामान्य माणसाचा फोन उचलून त्यांचे काम मार्गी लावले नाही पाच वर्षात दिसले ते फक्त टीव्ही व्हाट्सअप फेसबुक सोशल मीडियावरच त्यांनी मोठा गाजावाजा केला .लोकसभेत उसाच्या प्रश्नावर बोलले नाहीत दुधाच्या प्रश्नावर बोलले नाहीत शेतात मध्ये जे माणिक मोती तयार होतात त्याच्या हमीभावावरती कधी तोंड उचकटले नाही त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये त्यांच्याबद्दल प्रचंड रोष निर्माण झालेला आहे गाव गाड्यामध्ये त्यांनी फक्त मोजकेच नेते मंडळी हाताशी धरले जनतेला मात्र वाऱ्यावर सोडले असे असताना भारतीय जनता पक्षाचे घटक पक्ष असलेले रयत क्रांती संघटनेचे राज्य प्रवक्ते राहुल बिडवे यांनी रणजीत निंबाळकर यांच्या उमेदवारीला तीव्र विरोध दर्शविल्याने निंबाळकर यांच्या अडचणीमध्ये वाढ झालेली आहे

राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या या माढा मतदारसंघांमध्ये रणजीत निंबाळकर खासदार होऊन एक टर्म पूर्ण केलेली आहे मग आता परत तेच तेच माणसं कशासाठी इतरांनाही संधी मिळाली पाहिजे भाजपचे नेते धैर्यशील मोहिते पाटील यांनी तर माढा मतदारसंघांमध्ये प्रचाराला सुरुवात देखील केलेली आहे भाजपच्या सहयोगी पक्षाने माढा लोकसभेची उमेदवारी मिळावी याकरता मागणी केलेली आहे व स्टंटबाजी करणाऱ्या रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या उमेदवारीला तीव्र असा विरोध देखील दर्शवलेला आहे राष्ट्रवादीच्या या बालेकिल्लाला सुरुंग लावण्यासाठी सदाभाऊंनी रणजीतसिंह नाईकनिंबाळकर यांना भाजपमध्ये प्रवेश देऊन माढ्यातून उमेदवारी देखील मिळवून दिली त्यानंतर खासदार होऊन सदाभाऊंच्या संघटनेकडे मात्र त्यांनी दुर्लक्ष केले पदाधिकारी कार्यकर्ते यांना कधी सन्मान दिला नाही व माढ्यात आता कुठेही कार्यक्रम असला की मोहिते पाटलांना खुन्नसदाखवण्यासाठी सदाभाऊंना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवतात परंतु पुढच्या काळात आमच्या संघटनेचा वापर निंबाळकरांना करू देणार नाही अशी रोखठोक भूमिका रयत क्रांती संघटनेने घेतलेली आहे

## सारथी संगणक प्रणालीवरील तांत्रिक अडचणी लवकरच दूर होणार

**सातारा :** परिवहन विभागाचे वाहन सेवा व सारथी सेवा या नागरिकांना (अर्जदार) यांना ऑनलाईन सेवा सुरु करण्यात आलेल्या आहेत. यामधील सारथी संगणक प्रणालीला वापरकर्त्यांना गेल्या दोन ते तीन दिवसांपासून तांत्रिक अडचणी येत आहेत. सारथी प्रणाली वापरकर्त्यांची संख्या जास्त आहे. संगणकावरील डेटाबेस फाईल मध्ये तांत्रिक समस्या निर्माण झालेने सारथी संगणक प्रणालीला अडचणी येत आहेत. सदर बाबतीत राष्ट्रीय विज्ञान सूचना केंद्र (छखउ) यांच्याद्वारे अडचणी दूर करणेचे कामकाज चालू आहे. सदर कामकाजास संगणकावरील डेटाबेस फाईल साईज जास्त असल्याने कालावधी लागत आहे. सारथी संगणकीय प्रणालीवरील तांत्रिक अडचणी लवकरच दूर केल्या जातील असे राष्ट्रीय विज्ञान सूचना केंद्र (छखउ) ने कळविले आहे. तरी काही कालावधीतच सारथी संगणकीय प्रणालीशी असणा-या तांत्रिक अडचणी दूर होतील व सारथी संगणक प्रणाली सुरळीतपणे चालू होईल असे प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी सारथी वापरकर्त्यांना कळविले आहे.

## स्व. भाऊसाहेब महाराज यांचा आज पुण्यस्मरणदिन

**सातारा :** सातारा तालुक्याचे भाग्यविधाते स्व. श्रीमंत छ. अभयसिंहराजे भोसले तथा भाऊसाहेब महाराज यांचा रविवार दि. ४ रोजी २० वा पुण्यस्मरण दिन आहे. यानिमित्ताने विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ९ वाजता शेंद्रे येथील अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर स्व. भाऊसाहेब महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. हायवे जवळ कणसे ढाब्यालगत कृषी उत्पन्न बाजार समिती उप बाजार आवार येथे जातिवंत खिलार जनावरांचे भव्य प्रदर्शन भरविण्यात येणार असून सकाळी १० वाजता या प्रदर्शनाचे उदघाटन होणार आहे.

याशिवाय सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत रक्तदान शिबीर आणि अभिवादन कार्यक्रम होणार आहे.

## वादात सापडलेल्या नाटकावरून आता समाजमाध्यमांत 'रामायण'

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्राच्या विद्यार्थ्यांचे रामायणातील व्यक्तिरेखा असलेले नाटक शुक्रवारी सायंकाळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) कार्यकर्त्यांनी बंद पाडले. पात्रांच्या तोंडी आक्षेपार्ह संवाद असल्याचा, धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप अभाविपकडून करण्यात आला. त्यामुळे नाटकाबाबत वाद होऊन कार्यकर्ते, कलाकार विद्यार्थ्यांमध्ये धक्काबुक्कीही झाली. हे प्रकरण पोलिसांत तक्रार दाखल करण्यापर्यंत गेले. मात्र या प्रकरणावरून समाजमाध्यमांत आता प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

ललित कला केंद्रातील विद्यार्थ्यांना मारहाण केली गेली असेल तर या कृत्याचा जाहीर निषेध, अशा शब्दांत ज्येष्ठ अभिनेते वैभव मांगले यांनी त्यांची प्रतिक्रिया मांडली. रंगकर्मी दीपक राजाध्यक्ष यांनी नाटक बंद पाडण्याच्या घटनेचा निषेध करून ललित कला केंद्राला पाठिंबा दिला. तर दिग्दर्शक संगीतकार अजय नाईक यांनी या नाटकावरून टीका केली. आम्ही कॉलेज जीवनात अनेक सादरीकरणे केली. रामलीला नावाचे नाटक सादर करता आणि राम-सीता यांचे वस्त्र परिधान करून तोंडी शिवराळ संवाद? हे होतंय पुणे विद्यापीठात? कोण आहेत ही लोकं? कोण आहेत हे शिक्षक जे असले 'ललित' विद्यार्थी घडवत आहेत? 'वैचारिक दारिद्र्य' आणि 'वैचारिक अधोगती' आहे ही. मी धिक्कार करतो या विकृतीचा, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

## दिल्लीत दि.६ व दि.७ रोजी असाक्षरांचा राष्ट्रीय मेळाव्याचे आयोजन

**सातारा :** साक्षरता कार्यक्रमांतर्गत मंगळवार दि.६ व बुधवार दि.७ रोजी दिल्ली येथे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या उपस्थितीत असाक्षर व नवसाक्षरांचा राष्ट्रीय मेळावा होणार आहे.

महाराष्ट्रातून ४ अधिकाऱ्यांसह २० जणांचे पथक या उल्लास मेळामध्ये सहभागी होणार आहे. केंद्र शासनाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता मंत्रालयाने याचे आयोजन केले आहे.सन २०२२ ते २७ या पंचवार्षिक कालावधीत दरवर्षी एक कोटी प्रमाणे पाच कोटी लोकांना साक्षर करण्याचे या योजनेअंतर्गत उद्दिष्ट आहे. देशभरातील ३० घटक राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे प्रातिनिधिक असाक्षर आणि नवसाक्षर स्वयंसेवी शिक्षकांसह नवी दिल्लीतील राष्ट्रीय बाल भवनात होणाऱ्या या मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत.महाराष्ट्रातून पुणे,अमरावती, गडचिरोली, कोल्हापूर आणि रत्नागिरी जिल्ह्यातून या मेळाव्यात चार अधिकारी, दोन असाक्षर, दोन स्वयंसेवक, दहा कलाकार आणि दोन विशेष निमंत्रित अशा वीस जणांचे पथक सहभागी होत आहे. योजना शिक्षण संचालनालयाचे उपसंचालक राजेश क्षीरसागर, सहाय्यक योजना अधिकारी विराज खराटे, राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषदेतील साक्षरता केंद्राच्या प्रमुख गीतांजली बोरुडे व अधिव्याख्याता पंढरीनाथ जाधव बयांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे पथक सांस्कृतिक कार्यक्रम योजनेअंतर्गत उल्लेखनीय कार्यक्रमांचे सादरीकरण करणार आहे. अभियानांतर्गत अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन यासाठी विकसित केलेल्या उल्लास व उजास मार्गदर्शिका,कृतिपत्रिका यांचे प्रकाशन होणार आहे. नवसाक्षर आणि असाक्षरांचे अनुभव प्रकटीकरण, स्वयंसेवकांचे चर्चासत्र, सांस्कृतिक कार्यक्रम होतील. प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र स्टॉल उभारण्यात येणार असून त्याद्वारे या अभियानांतर्गत झालेल्या व सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती तसेच अध्ययन अध्यापनासाठी विकसित केलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन स्टॉलद्वारे करता येणार आहे. कोल्हापूर डाएटचे अधिव्याख्याता तुकाराम कुंभार यांच्या नेतृत्वाखाली दहा जणांचे कलापथक साक्षरतेवर हिंदी पोवाडा सादर करणार आहे. राष्ट्रीय पातळीवर शिक्षण प्रेरणा देणा-या कलाकृतीची दखल घेतलेल्या रत्नागिरीच्या अनन्या चव्हाण व तिच्या पालकांना केंद्र शासनाने विशेष निमंत्रण दिले आहे. तिने साकारलेल्या कलाकृतीसह राज्यात साक्षरता प्रचारात प्रेरणादायी ठरत असलेले चित्रकार मोहन जगताप



यांनी टिपलेले सातारा तालुक्यातील चिंचणी येथील ७६ वर्षीय बबई मस्कर यांचे साक्षरता वर्गातील पहिल्या दिवसाचे छायाचित्र आणि मणक्याच्या आजाराने त्रस्त असून शिक्षण घेण्याची उर्मी असलेल्या बारामती येथील ७६ वर्षीय सुशीला क्षीरसागर व रुचिता क्षीरसागर यांची कॅनव्हासवर चित्रीत केलेली छायाचित्रे केंद्रीय शिक्षण मंत्रालयास राज्याकडून भेट देण्यात येणार आहेत.

## कुणबी प्रमाणपत्र देण्याचा जीआर ओबीसींवर अन्याय करणारा

### कोपरगावात ओबीसी समाजाचा मोर्चा

**कोपरगाव :** महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाला सगेसोयरे या धर्तीवर कुणबी प्रमाणपत्र देण्याचा जी.आर. काढून आश्वासन दिले. यामुळे ओबीसींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा निर्णय मूळ ओबीसींवर अन्याय करणारा असल्याचे मत माजी नगराध्यक्ष पद्मकांत कुदळे यांनी व्यक्त केले.

कोपरगाव येथे गुरुवारी ओबीसी समाजाचा मोर्चा तहसील कार्यालयावर नेण्यात आला. यावेळी कुदळे बोलत होते. मोर्चेकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना दिले. या निवेदनात म्हटले आहे की, सरकारने मूळ ओबीसींचा



विचार करून २६ जानेवारी रोजी मराठा आरक्षण सगेसोयरेसंदर्भात काढलेला जी.आर. त्वरित रद्द करावा, शिंदे समितीच्या माध्यमातून वितरित करण्यात आलेल्या कुणबी प्रमाणपत्रांच्या आधारे कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही शासकीय सवलतींचा, आरक्षणाचा लाभ देण्यात येऊ नये. मोर्चात पद्मकांत कुदळे, रमेश गवळी, जगदीश मोरे, राजेंद्र सोनवणे, विनायक गायकवाड, दिनार कुदळे, दीपक राऊत, गणेश लकारे, वाल्मिक लहिरे, गौरव माळी, गोरख देवरे, सुनील फंड, मुकुंद उदावंत, प्रदीप नवले, दीपक भास्कर, सुनील क्षीरसागर, आशिष निकुंभ, योगेश बागुल, सुधाकर क्षीरसागर, धनंजय कहार, चंद्रकात वाघमारे, विवेक सोनवणे, अशोक लकारे, राजेंद्र गायकवाड, वीरेन बोरावके, अविनाश पाठक आदी सहभागी झाले होते.

आयोगावर वादग्रस्त आणि बेकायदेशीरपणे झालेल्या सुनील सुक्रे, ओमप्रकाश जाधव व अंबादास मोहिते यांच्या नियुक्त्या तत्काळ रद्द करण्यात याव्यात, मागासलेपणाचे मूल्यांकन करण्यासाठी नवीन स्वतंत्र, तटस्थ, अलिप्त संस्थेची व आयोगाची नेमणूक करावी, या आयोगामार्फत ओबीसीतील सर्व जातींचे मागासलेपण तपासण्यात यावे व त्या तुलनेत मराठा समाजाचे मागासलेपण तपासले जावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## धनगर आरक्षण मागणीला पक्षाचा व माझा पूर्ण पाठिंबा : रणजितसिंग देशमुख

**म्हसवड :** तमाम धनगर बांधवांना केवळ एका शब्दा मुळे ७० वर्षापासून समाजाला आरक्षणापासून वंचित राहिला आहे.

तरी त्या समाजाला त्यांचा हक्काचे आरक्षण मिळवून देण्यासाठी आगामी काळात सर्व आमदार खासदार यांनी लक्ष घालून धनगड या शब्दा ऐवजी धनगर हा शब्द दुरुस्त करून धनगर समाजाला एस टी मधून सवलत मिळावी यासाठी केंद्र व राज्य सरकारने राष्ट्रपती यांना दुरुस्ती साठी शिफारस करण्यासाठी एकत्र येवून धनगर समाजाला न्याय देण्यासाठी वरिष्ठ पातळीवर भेटी घेणार असल्याचे मत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सदस्य व कारवाई समुहाचे प्रमुख रणजितसिंग देशमुख यांनी म्हसवड या ठिकाणी सुरू असलेल्या अमरण उपोषणाला भेट देवून धनगर आरक्षण मागणीला पक्षाचा व



माझा पूर्ण पाठिंबा असल्याचे जाहीर केले त्यावेळी बोलत होते

म्हसवड येथे धनगर समाजातील ३ युवकांनी राज्यव्यापी धनगर आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आमरण उपोषण भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या दिवसा पासुन पालिकेच्या समोर सुरू केले आहे या अमरण उपोषणाच्या माध्यमातून झोपलेल्या व सतत चालढकल करणार्या सरकारला जागे करण्यासाठी हे शेवटचे व अंतिम उपोषण असल्याने या आंदोलनाला अनेक गावातून पाठिंबा मिळत असून या आंदोलनाला स्थळी रोज ऐका गावोगावचे गजी नृत्य व ओवीकार येवून आपल्या ओव्यातून आपले प्रश्न पोटतिडकीने मांडत आहेत या आंदोलनाला विविध पक्षाची राजकीय मंडळी हजेरी लावून आपला पाठिंबा देताना दिसतात काल या आंदोलनाला हरणाई सुतगिरणीचे संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सदस्य रणजितसिंग देशमुख, माण तालुकाध्यक्ष पै माने, राजीव गांधीं पंचायत राज संघटना महाराष्ट्र प्रदेश सचिव शिवाजीराव यादव, उपाध्यक्ष देवानंद जगताप, विद्यार्थी आघाडीचे तांबोळी आदीनी या वेळी उपस्थिती लावली होती

धैर्यशील मोहिते पाटील

धनगर समाज्याच्या प्रत्येक आंदोलन असो,विकासाच्या कामाचे प्रश्न असो,वा कुणाचे वैयक्तिक प्रश्न आसो, सुख दुखात मोहिते पाटील घराणे कायम सोबत राहिले आहे आणि राहणार आहे आरक्षणाच्या मागणीसाठी सध्याच्या सरकारकडे आपन स्वता आग्रह धरुन धनगड या एका अक्षरा मुळे ७० वर्षे हा समाज झगडत आहे तो शब्द दुरुस्ती साठी भेट घेऊन समाजाला न्याय देण्यासाठी प्रयत्न करण्याचा शब्द देत मी व आमचे सर्व कुटुंब तुमच्या

## आता फक्त 'या' शेतकऱ्यांना मिळणार ६००० रुपये

**नवी दिल्ली :** पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत शासनाकडून दरवर्षी शेतकऱ्यांच्या खात्यावर ६००० रुपये दिले जातात, मात्र या रकमेचा लाभ पात्र शेतकरी कशाप्रकारे घेत आहेत, याची माहिती शासनाला मिळू शकलेली नाही. यामुळेच सरकारने आता सर्व लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्ड योजनेशी जोडण्याचे निर्देश दिले आहेत. याशिवाय, शेतकऱ्यांना ई-केवायसी ही करणं बंधनकारक आहे. या दोन्ही गोष्टी न केल्यास शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे हे शेतकरी ६००० रुपये लाभापासून वंचित राहतील.

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेतील फसवणूक टाळण्यासाठी केंद्र सरकारने ई-केवायसी किंवा एनपीसीआय आणि जमीन पडताळणी अनिवार्य केली आहे. ही मोहीम किसान क्रेडिट कार्ड खातेधारक नसलेल्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांचे किसान क्रेडिट कार्ड योजनेशी जोडण्याची तयारी सुरू आहे. यासाठी सर्व कृषी समन्वयक आणि शेतकरी सल्लागारांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**आता फक्त 'या' शेतकऱ्यांना मिळणार ६००० रुपये**

**मिळालेल्या माहितीनुसार, पीएम किसान योजनेंतर्गत शासनाकडून दरवर्षी पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर ६००० रुपये दिले जातात, मात्र या रकमेचा लाभ लाभार्थी पात्र शेतकरी कसा घेत आहेत, याची माहिती शासनाला मिळत नाही. या परिस्थितीत सर्व शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड देण्याची योजना तयार करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, अशा शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश केला जाईल. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना बँकेकडून कर्जही दिलं जाईल.**

# मुहूर्ताच्या हळदीस दराची झळाळी



## सांगलीत विक्रमी ३१ हजारांचा भाव

**परपेठ हळदीचे दर**
किमान ८६००
कमाल १३,०००
सरासरी १०,८००

**राजापुरी हळदीचे दर**
(प्रतिक्विंटल)किमान
१०,५००कमाल ३१,०००
सरासरी २०,७५०

**सांगली :** हळदीचा नवा हंगाम सुरू झाला असून, सांगली कृषी उत्पन्नबाजारसमितीमध्ये शुक्रवारी नवीन हळदीच्या सौद्यांना सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी राजापुरी हळदीची ४९७ क्विंटल, तर परपेठ हळदीची ११७ क्विंटल आवक झाली.

बावची (ता. वाळवा) येथील शेतकरी राजेंद्र आनंदराव पाटील यांच्या राजापुरी हळद प्रतिक्विंटल ३१ हजार रुपयांचा विक्रमी भाव मिळाला. सरासरी १५ हजार रुपये क्विंटल भाव राहिला. पहिल्या दिवशी दोन हजार २२८ पोती विक्रीसाठी आली होती.

सांगली मार्केट यार्डात नवीन हळद सौदे शुभारंभ जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षा जयश्री पाटील वबाजारसमितीचे सभापती सुजय शिंदे यांच्या हस्ते केला.

मुहूर्ताचे नवीन हळद सौदे शुभारंभाला गणपती कृषी जिल्हा औद्योगिक सोसायटी येथून सुरुवात झाली. प्रथम हळद शेतीमाल पोत्यांचे पूजन करण्यात आले. राजेंद्र पाटील या शेतकऱ्याच्या राजापुरी हळदीला उच्चांकी ३१ हजारा रुपये क्विंटल दर मिळाला.

यावेळी उपसभापती रावसाहेब पाटील संचालक संग्राम पाटील, बापूसो बुरसे, स्वप्निल शिंदे, काडाप्पा वारद, बिराप्पा शिंदे. शकुंतला बसवराज बिराजदार, प्रशांत पाटील, मारुती बंडगर, बाजार समिती सचिव महेश चव्हाण, उपसचिव नितीन कोळसे, चेंबरचे अध्यक्ष अमरसिंह देसाई, हळद व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकांत मर्दा, दिलीप आरवाडे, मनोहर सारडा, व्यापारी, शेतकरी, हमाल उपस्थित होते.असे आहेत.

# शिवगर्जना करीत सातारा जिल्हा बँकेने प्रतापगडावर राबविली स्वच्छता मोहीम



स्वच्छ भारत अभियान, छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्याभिषेकाचे ३५० वे वर्ष आणि बँकेचे अमृतमहोत्सवी वर्ष या तिन्हींचे औचित्य साधून सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने गड किल्ले स्वच्छता अभियान राबविले आहे.

यामध्ये प्रतापगड किल्ला येथे स्वच्छता हीच सेवा या उपक्रमा अंतर्गत दि. २१/०१/२०२४ रोजी स्वच्छता मोहीमेचा शुभारंभ केला. आपला परिसर आणि आपल्या इतिहासाचे साक्षीदार असलेले गडकिल्ले स्वच्छ आणि सुंदर ठेवले पाहिजेत या पार्श्वभूमीवर बँकेच्या अमृत महोत्सवानिमीत्त छ. शिवरायांना एक अनोखी मानवंदना स्वच्छतेच्या माध्यमातून देणेत आली. सदर मोहीमेत महाबळेश्वर तालुका, वाई तालुका व मुख्य कार्यालयाचे सेवक उपस्थित होते. प्रतापगड किल्ला परिसर व किल्ल्याच्या पायथ्यापासून ते पाय-या तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर यावेळी स्वच्छ करणेत आला. तसेच बँकेतर्फ वन व्यवस्थापन उपसमिती किल्ले प्रतापगड यांना कचरा गोळा करणेसाठी बॅग, झाडू व इतर साहित्य देणेत आले. मोहिमे विषयी माहिती देताना बँकेचे सरव्यवस्थापक श्री. राजीव गाढवे म्हणाले, महाराष्ट्राला गड-किल्ल्यांचा वैभवशाली इतिहास प्राप्त असून राज्यात साधारणत: ३५० किल्ले आहेत. सदर वारसा जतन करण्याचे काम केंद्र व राज्य शासन तसेच स्वयंसेवी संस्था करीत आहेत. किल्ल्यांची देखभाल करणे, त्याचे जतन व संवर्धन करणे व सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांची स्वच्छता ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. त्याचाच एक भाग म्हणून बँकेच्या मा. संचालक मंडळाचे निर्णयानुसार छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार रूजविणे बरोबरच त्यांच्या अस्तित्वाच्या खुणा असलेले किल्ले स्वच्छ ठेवणे ही जबाबदारी पार पाडणेसाठी बँकेने 'गड-किल्ले स्वच्छता अभियान मोहीम' राबविली आहे.

## महत्त्वाचे

### औंध येथे आज भव्य बैलगाडा शर्यती

**औंध :** औंध येथील श्री यमाई देवी यात्रेनिमित्त रविवार दि.४ रोजी भव्य बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देवस्थानच्या मुख्य विश्वस्त गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी यांनी दिली

श्रीयमाईदेवीच्या पौषी उत्सवानिमित्त श्री यमाईदेवी देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामस्थ औंध यांच्या वतीने करण्यात आले आहे. येथील औंध ते खरशिंगे रस्त्यावरील सरकारी मळा येथे या शर्यती होणार आहेत.

शर्यतीमधील पहिल्या पाच क्रमांकासाठी अनुक्रमे एक लाख रुपये,७५ हजार रुपये,५०, हजार रुपये,३५ हजार रुपये,२५ हजार रुपये व पुढील क्रमांकासाठी अन्य अनेक आकर्षक रोख पारितोषिके दिली जाणार आहेत. शर्यती यशस्वीपणे पार पाडण्यासाठी गणेश देशमुख, अनिल माने , उपसरपंच दिपक नलवडे, तानाजी इंगळे, धनाजी यादव, शैलेश मिठारी, संतोष जायकर, धनाजी यादव व शेतकरी मंडळ आयोजन कमिटी परिश्रम घेत आहे. बैलगाडी मालक आणि शौकीनांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन बैलगाडी शर्यत कमेटीच्या वतीने करण्यात आले.

# 'भारतरत्न'साठी लालकृष्ण अडवाणींचं राज ठाकरेंकडून अभिनंदन, पण भाजपाला खोचक टोला



**मुंबई :** भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेतेलालकृष्ण अडवाणीयांना भारतरत्न पुरस्कार जाहीर झाल्यानंतर विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे. मनसे अध्यक्षराज ठाकरे यांनीही लालकृष्ण अडवाणींना भारतरत्न दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करत केंद्र सरकारचेही आभार मानलेत. परंतु अडवाणींना पुरस्कार याआधीच मिळायला हवा होता असं म्हणत राज ठाकरेंनी भाजपाला खोचक टोला लगावला.

राज ठाकरे यांनी ट्विट करत म्हटलं की, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पक्षाच्या प्रमुख संस्थापकांपैकी एक लालकृष्ण अडवाणी ह्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान घोषित झाला ह्याबद्दल त्यांचं मनापासून अभिनंदन. केंद्र सरकारचं देखील अभिनंदन, अर्थात गेली १० वर्ष केंद्रातील निर्विवाद सत्ता हाती असताना, ज्यांच्यामुळे भाजपा आज ज्या स्थानावर आहे त्या व्यक्तीला हा सर्वोच्च सन्मान ह्या आधीच मिळायला हवा होता. अर्थात हा त्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे. असो असं त्यांनी म्हटलं.

तसेच करोडो भारतीयांचं आणि अनेक पिढ्यांचं, राममंदिराचं स्वप्न पूर्ण झालं, त्यात मोलाचा वाटा हा अडवाणीजींचाच, आणि हे करताना त्यांनी स्वतः ची राजकीय कारकीर्द पणाला लावली. राजकीय अस्पृश्यता आणि उपेक्षा सहन केली. रथयात्रेतून अडवाणींनी देशातील हिंदूंची अस्मिता जागृत केली आणि भारतीय जनता पक्षाचा उदय झाला, पण हे करताना 'अब की बारी अटलबिहारी' म्हणण्याइतका मनाचा मोठेपणा हा अडवाणींकडे होता. देशाच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून आजपर्यंतच राजकारण पाहिलेले आणि देशातील राजकारणाला वळण देणाऱ्या ह्या ज्येष्ठ नेत्याचं ह्या सर्वोच्च नागरी सन्मानासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे मनापासून अभिनंदन असंही राज ठाकरे यांनी म्हटलं.अतिशय योग्य निवड!

भारतरत्न पुरस्कारासाठी कर्पुरी ठाकूर आणि लालकृष्ण अडवाणी या दोन व्यक्तींची झालेली निवड अतिशय योग्य आहे. कर्पुरी ठाकूर यांनी समाजातील दुबळ्या वर्गासाठी काम केलं. १९७८ साली मी महाराष्ट्रचा मुख्यमंत्री झालो, तेव्हा कर्पुरी ठाकूर हे बिहारचे मुख्यमंत्री होते.

मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये अनेकदा आमची चर्चा होत असत. अतिशय साधे आणि विनम्र, मात्र विचाराबाबत अत्यंत भक्कम असं त्यांचं व्यक्तिमत्त्व होतं. त्यामुळे त्यांची निवड ही योग्यच आहे. दुसरीकडे, लालकृष्ण अडवाणी हे अनेक वर्ष देशाच्या संसदेत होते. ते दिल्लीतून निवडूनही गेले होते. एखादा-दुसरा अपवाद सोडला तर त्यांचा कधी पराभव झाला नाही. सार्वजनिक जीवनात स्वच्छ चारित्र्याची व्यक्ती म्हणून त्यांचा लौकिक होता, अशा शब्दांत शरद पवार यांनी लालकृष्ण अडवाणी यांचं कौतुक केलं आहे.

# मेढा ग्रामीण रुग्णालयात सर्व रोग निदान शिबिर संपन्न

**मेढा :** मेढा ग्रामीण रुग्णालयामध्ये शनिवार दिनांक ३. रोजी सर्व सामान्यांचा आधारस्तंभ असलेल्या शासकीय रुग्णालयात कर्करोग व कॅन्सर सारख्या दुर्धर आजारावर शिबिर संपन्न झाले.

डॉक्टर ऋग्वेद नाईक व डॉक्टर विशाल लावंड यांनी प्रत्यक्ष रुग्णांना कर्करोग कॅन्सर कसा होतो व त्याची लक्षणे काय असतात पुरुषांना तंबाखू गुटखा दारू यामुळे कर्करोग व कॅन्सर कसा होतो तोंडात पांढरे डाग कशामुळे येतात.

तसेच स्त्रियांसाठी मासिक पाळी व स्तनांमध्ये कशाप्रकारे दोष असतात त्या दोषामुळे कोणता रोग उद्भवतो हे रोग टाळण्यासाठी तंबाखू गुटखा दारू मिस्त्री यासारख्या व्यसनांना तुम्ही कायमस्वरूपी बंद केले पाहिजे समजा एखाद्याला झाला तर तुम्ही मोठ्या हॉस्पिटल ला न जाता शासकीय रुग्णालयात याचा लाभ करून घ्यावा त्यासाठी आपल्या येथे सर्व सुविधा उपलब्ध आहेत तसेच रुग्णांना असे आव्हान केले की प्रत्येकाने आत्ताच तंबाखू गुटखा दारू मिस्त्री आत्ताच सोडून शपथ घेऊन सर्व व्यसनांना आमच्याकडे दान करावे . अन्यथा ज्याच्या जवळ तंबाखू गुटखा मिसरी सापडेल त्यांना दोनशे रुपये दंड आकारले जाईल. त्याप्रमाणे प्रत्येक स्त्री पुरुषांनी स्वतःहून उठून शपथ घेऊन तंबाखू च्या पुड्या, गुटक्याच्या पुड्या, मिस्त्री ह्या वस्तू स्वतःहून काढून दानपेटीत दान केले व शपथ घेतली इथून पुढे आम्ही असे व्यसने करणार नाही. त्यानंतर प्रत्येक रुग्णांची रक्त तपासून योग्य ते उपचार केले.

# म्हसवड येथे धनगर आरक्षणासाठी राज्यव्यापी निर्धार मेळाव्याचे आयोजन

**बिदाल :** म्हसवड (ता माण )येथे गेल्या आठ दिवसापासून धनगर आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू आहे. मात्र या उपोषणाकडे लोकप्रतिनिधी व सरकारने अजिबात लक्ष दिले नाही. आरक्षण लवकर मिळावे या मागणीसाठी रविवारी राज्यव्यापी धनगर आरक्षण निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

धनगर समाज अनेक वर्षापासून घटनेत असलेल्या अनुसूचित जमाती आरक्षण अंमलबजावणीची मागणी करीत आहे. यासाठी आंदोलन, उपोषण व मोर्चे काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना या पक्षांनी धनगर समाजाची फसवणूक केली.सरकार सत्तेच्या बाहेर असते तेव्हा ते सरकार धनगर समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे म्हणते, तेच सरकार धनगर समाजाच्या मतांवर सत्तेत बसते तेव्हा ते मूग गिळून गप्प बसते. यामुळे समाजात असंतोष पसरला असल्याची भावना व्यक्त होत आहे.धनगर बांधवांना एसटी प्रवर्ग आरक्षणाच्या अंमलबजावणीचे आश्वासन दिले गेले होते, प्रत्यक्षात सरकारने काहीही हालचाल केलेली नाही.

# शंकर गुरव यांच्याकडून आसनगावातील श्री सालपाई देवी मंदिर दिपमाळीसाठी १ लाख ९० हजार रूपये

**आसनगाव :** आसनगाव येथील सुपुत्र तसेच राष्ट्रपती पदक मिळवलेल्या शंकर गुरव यांनी आसनगाव ता.कोरेगाव येथील श्री सालपाई देवी मंदिर परीसरातील दिपमाळीसाठी १ लाख ९० हजार रूपये दिले आहेत.

बुधवार दिनांक ३० रोजी त्यांच्या हस्ते कामाचा नारळ व पूजन करून शुभारंभ करण्यात आला. शंकर गुरव हे गुप्तहेर खातामधून निवृत्त झालेले अधिकारी असून ते राष्ट्रपती पदक विजेता आहेत.त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण आसनगाव येथील प्राथमिक शाळेत घेतले आणि पुढील शिक्षण हे सातारा येथे घेतले.शंकर गुरव हे विविध माध्यमातून नेहमी गावासाठी मदत करीत असतात .

या अगोदर त्यांनी शाळेसाठी वॉटर फिल्टर शाळेला भेट दिला आहे,गावातील मंदिरासाठी त्यांनी मोठी मदत केली आहे, शाळेतील मुला-मुलींना स्पोर्ट्स ड्रेस दिले आहेत.



दिपमाळ कामाचा नारळ फोडताना शंकर गुरव व उपस्थित ग्रामस्थ

अशाप्रकारे अनेक माध्यमांतून शंकर गुरव हे मदत करीत असतात.

हा कार्यक्रम मंगळवारी सकाळी ११:३० वाजता श्री सालपाई देवी मंदिर प्रांगणात गावातील प्रमुख ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.संतोष शिंदे यांनी यावेळी आभार मानले.

# शिरोळ येथे राजर्षी शाहूनगर वाचन मंदिराच्या व्याख्यानमालेची सांगता

## आईचे महत्व आणि बापाचा त्याग जाणून घ्या : डॉ स्वाती शिंदे

**शिरोळ :** मी आणि माझ्यापुरते ही विचारधारा बोकाळत निघाली आहे . त्यामुळे विचार मतभेदातून नाती दूर जाताना दिसतात . मुलानी बापाचे कष्ट , यातना समजून घेण्याची गरज असून लहानाची मोठी झालेली मुलं आज आई-वडिलांना पाहतील की नाही अशी स्थिती आहे . हे चित्र बदलायचे असेल तर आईमध्ये माता सावित्री आणि बापामध्ये महात्मा ज्योतिबा दिसले पाहिजेत.

केवळ खाणं आणि ऐष करून आयुष्य काढणारी मुलं आई -बापाचं भलं करणार नाहीत. त्यामुळे जन्मदात्या मुलापेक्षाही निराधार व गोरगरीबांचं एखादं मूल दत्तक घेतलं तर मोठं पुण्याईचं काम होईल. मुलानो ,बाप समजून घेताना त्यांना दुःख देऊ नका . आईचे महत्व आणि बापाचा त्याग जाणून घ्या असे मत डॉ स्वाती शिंदे (विटा ) यांनी व्यक्त केले.



**शिरोळ येथील राजश्री शाहू वाचनालया व्याख्यानमालीची सांगता करताना साहित्यिका स्वाती शिंदे.**

येथील छत्रपती शिवाजी चौकातील पटांगणात राजर्षी शाहू नगर वाचन मंदिराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राजर्षी शाहू व्याख्यानमालेत बाप समजून घेताना....या विषयावर त्या बोलत होत्या. प्रा माधुरी सचिन माळी यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चारुशीला संजय पुजारी होत्या . शतकोतर राजर्षी शाहू नगर वाचन मंदिराच्या वतीने २३ जानेवारीपासून सुरू झालेल्या व्याख्यानमालेची सांगता शुक्रवारी झाली.

या व्याख्यानमालेत सौ राणी पाटील यांचे आजच्या युगात स्त्रियांची भूमिका या विषयावर व्याख्यान झाले. विजय जाधव यांचे बहारदार कथाकथन तर एस बी ओऊळकर यांनी संत वाङःमय परिचय याविषयी व्याख्यान दिले . सलग चार दिवस झालेल्या या व्याख्यानमालेस श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी सामाजिक कार्यकर्त्या टारे उद्योग समूहाच्या स्नेहल अतुल टारे , गटशिक्षणाधिकारी भारती कोळी, माजी उपनगराध्यक्षा कमलाबाई शिंदे, राष्ट्रीय खेळाडू मुक्ता कळेकर, आदर्श मुख्याध्यापिका कल्पना काळे, उद्योजिका सुप्रिया पाटील, ऋतुजा शेट्टी , देविका मोरे, डॉ सारिका माने, प्राजक्ता गोंदकर, वेदांतिका पाटील, अन्नपूर्णा कोळी यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

वाचन मंदिराचे अध्यक्ष प्रा अण्णासाहेब गावडे यांनी स्वागत करून संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. प्रा कल्पना पंडीत काळे यांनी आभार मानले . वाचनालयाच्या संचालिका जयश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### सार्वजनिक प्रशासनातील उत्कृष्टतेसाठी पंतप्रधान पुरस्कार २०२३ योजना

**नवी दिल्ली :** देशभरातील सनदी अधिकाऱ्यांनी केलेल्या उत्कृष्ट सेवेची दखल घेत अशा अधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव करून, त्यांना सन्मानित करण्यासाठी, केंद्र सरकारने सार्वजनिक प्रशासनातील पंतप्रधान उत्कृष्टता पुरस्कार योजना सुरू केली आहे.

वर्ष २०२३ साठी सार्वजनिक प्रशासनातील उत्कृष्टतेसाठीच्या पंतप्रधान पुरस्कार योजनेत सुधारणा करून, त्यात जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासात सनदी अधिकाऱ्यांनी दिलेल्या योगदानाचा, विविध श्रेणींमध्ये समावेश करण्यात आला आहे. सार्वजनिक प्रशासनातील उत्कृष्टतेसाठी देण्यात येणारा पंतप्रधान पुरस्कार, २०२३ अंतर्गत नामांकनाची तारीख १२ फेब्रुवारी पर्यंत वाढवण्यात आली आहे.

नामांकनांच्या श्रेणींमध्ये -- श्रेणी-१- १२ प्राधान्य क्षेत्र कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यांचा सर्वांगीण विकास. या श्रेणीत १० पुरस्कार दिले जातील. तसेच, श्रेणी २ मध्ये केंद्रीय मंत्रालये/विभाग, राज्ये, जिल्ह्यांसाठी नवकल्पना. या अंतर्गत ६ पुरस्कार दिले जातील.

### खनिजाची चोरी होते याची पोलीसांनी तक्रार दाखल करण्याचे आदेश देऊनही

# तहसिल कार्यालयाचे उदासिन धोरण



**बाणेर :** बाणेर येथे गौण खनिजाची चोरी होत असतांना तक्रार दाखल करूनही दखल तहसिलदार कार्यालया कडून घेतल्या गेली नाही खनिजाची चोरी होते याची पोलीसांनी तक्रार दाखल करण्याचे आदेश देऊनही तहसिल कार्यालयाचे उदासिन धोरण दिसत आहे', तहसिल कार्यालय बघ्याची भूमीका घेत आहे

बाणेर येथिल सर्वे नंबर ७३ तेज इलेव्हिया प्रोजेक्ट साठी खोदकाम करण्यात येत आहे यांना १२२५ ब्रास खोदाईची परवानगी दिली होती प्रत्यक्षात २४४२ ब्रास इतकी खोदाई करण्यात आली या बाबत सदर तक्रार तूकाराम कळमकर केल्या नंतर मंडल अधिकारी यांच्या कडून१/२/२०२३ रोजी पंचनामा केला गेला परंतू आज पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही वेळोवेळी तक्रार करूनही दखल या कामाबाबत घेण्यात आली नाही यानंतर कळमकर यांनी जिल्हाधिकारी खनिजकर्म अधिकारी यांना देखील कारवाई संदर्भात पत्रव्यवहार केला यानंतर चतुर्श्रृंगी पोलीसांनी आदेशात गौण खनिजाची चोरी संदर्भात तहसिलदार यांच्या कडे दि १८/८/२०२३ रोजी तक्रार करून कळविले यात पुष्कळ दिवस होऊनही तहसिलदार यांच्या कडून तक्रार दाखल करण्यात आली नाही आणि दंडात्मक कारवाई केली नाही सदर प्रकरणात आर्थिक भ्रष्टाचार झाला असल्याचे

देखील तूकाराम कळमकर यांनी म्हटले आहे याची तक्रार मुख्यमंत्री कार्यालया कडे करून तक्रारीची दखल घेण्याची मागणी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे

तहसिलदार कार्यालयाच्या उदासिन धोरणामुळे या विभागात खोदकामाची कमी मागणी करून जास्तीचे खोदकाम करून दिवसा ढवळ्या गौण खनिजाची लूट होत आहे यात फार मोठे धोगेदोरे गूंतलेले असल्याचे बोलल्या जाते गौण खनिजाची बाणेर मध्ये चोरी केल्या जात असून शासनाचा कोट्यावधी रूपयाचा महसूल देखील बुडवल्या जात आहे या प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी येथिल जनते कडून होत आहे.

# ‘गाळ मुक्त तलाव गाळयुक्त शिवार’ योजना गेली कुणीकडे?

## तालुक्यातील शेतकऱ्यांकडून महसूल प्रशासनाला विनवणी : खटाव तालुक्यात शेतकऱ्यांना तलावातील गाळ मिळू द्या

**वडूज :** खटाव तालुक्यातील असणाऱ्या तलावातून शेतीसाठी गाळ मिळू द्या अशी आर्त् हाक आता तालुक्यातील शेतकरी महसूल प्रशासन व संबंधित विभागाला देताना पाहायला मिळत आहेत. एकीकडे गाळ मुक्त तलाव गाळ युक्त शिवार अशी योजना शासन दरबारीं सुरु असताना इकडे मात्र गाळ काढण्याच्या परवानगी साठी शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागत असल्याची चर्चा आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की गेल्या महिन्यात खटाव तालुक्यातील महसूल प्रशासनाने येथील येळीव , दर जाई व काही ठिकाणी गाळ काढण्यासाठी शेतकऱ्यांना परवानगी दिली होती. याठिकाणच्या शेतकऱ्यांनी शासनाचा असणारा महसूल भरून ही परवानगी काढली होती. ज्या शेतकऱ्यांनी परवानगी काढली होती त्यांनि उतखणन करण्यास सुरुवात सुद्धा केली होती.

दरम्यान याबाबतचे वृत्त प्रसार माध्यमातून प्रसिद्ध झाल्यानंतर महसूल च्या काही कर्मचाऱ्यांनी याठिकाणी जाऊन परवानगी धारक शेतकऱ्यांना गाळ काढण्यास बंद करण्यास सांगितले. यामुळे शेतकऱ्यांचे पैसे मातीत गेले का अशा तीव्र प्रतिक्रिया उमटण्यास सुरुवात झाली. शेतकऱ्यांचे काही शिष्ट मंडळ तहीलदार बाई माने यांना येऊन भेटले सुद्धा मात्र आता जिल्हाधिकारी यांच्याकडून परवानगी घ्यावी अस सांगण्यात आल्याचे समजले.



एकीकडे खोलिकरण करून तलावतील पाणी साठ्यात वाढ करण्यात येईल असे असताना सुद्धा शेतकरी महसूल भरून सुद्धा गाळ मिळवण्यासाठी धडपडत असताना महसूल अशा कामात दिरंगाई का करत आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे. खटाव तालुक्याची तहान भागवणारे येरळवडी धरणात मोठ्या प्रमाणत गाळ आहे. त्याठिकाणी सर्व परवानगी घेऊन उपसा केल्यास याठिकाणी धरणच्या खोलीत वाढ होऊन पाणी साठा मोठ्या प्रमाणात होऊ शकतो.

मात्र सदरचे धरण हे वनविभागाच्या अख्तरित येत असल्याचे कारण देत याठिकाणी गाळ उपसा करण्यास परवानगी मिळत नसल्याचे चित्र आहे. यामुळे आता जिल्हाधिकारी यांनी खटाव सारख्या दुष्काळी भागाकडे लक्ष देऊन . शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

**खटाव तालुक्यातील जल संधारण विभागच्या अखतरीत् येणाऱ्या तलावातील गाळ काढण्यासाठी रीतसर परवानगी काही शेतकऱ्यांनी घेतली आहे. त्यांच्या असणाऱ्या नियमाप्रमाणे गाळ उपसा सुद्धा करण्यात आला होता. मात्र त्याठिकाणी तलावलगत असणाऱ्या काही लोकांनी वादा वादी करून शेतकऱ्यांना त्रास देणे सुरु केले आहे. त्यामुळे काही शेतकऱ्यांना पैसे भरून ही मोकळ्या हातांनी परत जावे लागले आहे. यावर प्रशासनाने तोडगा काढण्याची मागणी होताना दिसत आहे.**

# साने गुरुजींच्या स्मारकास निधी उपलब्ध करून देणार : उपमुख्यमंत्री अजित पवार



**जळगाव :** महाराष्ट्रात अध्यात्म, ज्ञान, तत्वज्ञान रूजविणार अमळनेर हे महत्त्वाचे शहर आहे. राज्याचा सर्वांगिण विकासाबरोबर साहित्य, कला, संस्कृती व क्रीडा क्षेत्रातही शहरांचा विकास झाला पाहिजे. तरच ते शहर श्रीमंत शहर म्हणून ओळखले जाईल. साहित्य संमेलनाला आर्थिक बाबतीत कमतरता पडू नये, याची दक्षता शासनाकडून घेतली जाते. मराठी साहित्य संमेलनास गौरवाशाली परंपरा आहे. तीन वर्षांनी होणारे शंभरावे साहित्य संमेलन दिमाखात पार पडण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करणार आहे. प्रताप हायस्कूलमध्ये सानेगुरुजींचे सहा वर्ष वास्तव्य होते. साने गुरुजींच्या स्मारकाचा प्रस्ताव जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी तयार करावा. या प्रस्तावानुसार साने गुरुजींच्या स्मारकास येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. साने गुरुजींचे नावाप्रमाणेच भव्य स्मारक झाले पाहिजे. अशी अपेक्षाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अमळनेर मराठी वाड्.मय मंडळाच्या वतीने आयोजित ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे येथील प्रताप महाविद्यालयाच्या मैदानावर आज उद्घाटन झाले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक प्रा.डॉ.रवींद्र शोभणे सपत्नीक उपस्थित होते. उद्घाटक म्हणून माजी लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन यांची उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, निमंत्रक तथा मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, आमदार मंगेश चव्हाण, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, उद्योजक अशोक जैन, साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, कार्यवाह उज्ज्वला मेहेंदळे, समन्वयक नरेंद्र पाठक, साने गुरुजींच्या पुतणी सुधा साने आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.पवार पुढे म्हणाले की, अमळनेर मध्ये सुरू झालेल्या अनेक गोष्टी जगात पोहचल्या आहेत. विप्रो कंपनी, तत्वज्ञान केंद्राचा जागतिक पातळीवर नावलौकिक आहे. बहिणाबाईंनी अतिशय सोप्या भाषेत जीवनाचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. राज्यात वाचनसंस्कृती वाढावी. यासाठी आम्ही शासनपातळीवर प्रयत्नशील आहे. डिजिटल युगात वाचन संस्कृती बदलली आहे. वाचनसंस्कृती टिकून राहणे. ही समाजाची गरज आहे. मराठी साहित्य संमेलनास आता डिजिटल टच देण्यात आला आहे. सामाजिक सुधारणांच्या चळवळीत साहित्य, लेखक व कलाकारांचे अमूल्य योगदान आहे. राज्याच्या विकासासाठी साहित्यिकांनी व्यक्त झाले पाहिजेत. त्यांच्या सूचनांचा निश्चितच स्वीकार केला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंर्त्यानी यावेळी दिली. साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी भाषा, संस्कृतीचे जतन होत असते, असेही त्यांनी सांगितले.

मराठी ही ज्ञानभाषा व्हावी, अशी भावना सगळ्या मराठी जनतेची आहे. तिला ज्ञानभाषा करण्याची जबाबदारी जशी? शासनाची आहे तसी आपल्या सर्वांची आहे. इंग्रजी, हिंदी आणि मराठी हा भाषाभ्यासाचा क्रम बदलून मराठी, हिंदी आणि इंग्रजी असा असावा. गाव खेड्यातील गरिबांच्या मुलांना आपल्या मातृभाषेतून

# ग्रामीण पोलीस दलात खांदेपालट, ’इतक्या’ अधिकाऱ्यांच्या बदल्या

**नाशिक :** महाराष्ट्र पोलीस दलात आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या बदल्यांचे वारे वाहत आहेत. नाशिकचे माजी ग्रामीण पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी पदभार सोडण्यापूर्वी जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांमध्ये खांदेपालट केली आहे. ग्रामीण दलात ६ पोलीस निरीक्षक, ७ सहाय्यक निरीक्षक व ५ उपनिरीक्षकांच्या बदल्या शहाजी उमाप यांनी केल्या आहेत.

पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्या बदलीपूर्वी ग्रामीण पोलीस दलातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांची सायबर पोलिस ठाण्यात नियुक्ती केली, तर राजू सुर्वे यांच्याकडे स्थानिक गुन्हे शाखेची जबाबदारी दिली आहे.

ग्रामीण पोलीस दलात खांदेपालट

मालेगाव कॅम्पचे दिलीप खेडकर यांची नाशिक तालुका पोलीस ठाण्यात, नियंत्रण कक्षातील दत्तात्रय लांडगे यांची मनमाड पोलीस ठाण्यात, चांदवडचे रवींद्र जाधव यांची मालेगाव कॅम्पला व नियंत्रण कक्षातील श्रद्धा गंधास यांची जिल्हा विशेष शाखेत बदली करण्यात आली आहे. नियंत्रण कक्षातील सुनील भाबड, दत्ता चौधरी यांची जिल्हा वाहतूक शाखेत, नव्याने हजर झालेले अरुण धनवडे यांची ओझर पोलीस ठाण्यात, नव्याने हजर झालेले सहायक पोलीस निरीक्षक सुनील बडे यांची नांदगाव पोलीस ठाणे, दिलीप राठोड यांची सिन्नर, राकेशसिंह परदेशी यांची दिंडोरी पोलीस ठाण्यात नेमणूक करण्यात आली आहे.

नियंत्रण कक्षातील पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब हंडाळ यांची लासलगावला, लासलगावचे अशोक मोकळ यांची नियंत्रण कक्षात, विजय सोनवणे यांची निफाड उपविभागीय अधिकारी यांच्याकडे वाचक म्हणून नेमणूक झाली आहे. नव्याने हजर झालेले हनुमान उगले यांची सिन्नरला, नांदगाव पोलीस ठाण्यातील कल्याणी पाटील यांची नियंत्रण कक्षात नेमणूक झाली आहे.

### नाशिकमध्ये रविवारपासून राज्यस्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धा

**महाराष्ट्र पोलीस दलाच्या राज्यस्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धा नाशिकमध्ये होत आहेत. स्पर्धेला रविवारपासून (दि. ०४) प्रारंभ होत असून, या स्पर्धेचे संयोजन नाशिक शहर पोलीस आयुक्तालय करीत आहे. स्पर्धेत राज्यभरातील सुमारे साडेतीन हजार पोलीस खेळाडू सहभागी होत आहेत. दोन वर्षांपूर्वी कोरोना प्रादुर्भावामुळे पोलीस क्रीडा स्पर्धा होऊ शकलेल्या नाहीत. या वेळी स्पर्धांना प्रारंभ झाला असून, गेल्या डिसेंबरमध्ये विभागीय पोलीस क्रीडा स्पर्धा परिक्षेत्रानिहाय पार पडल्या. त्यानंतर आता राज्यस्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धा होत आहेत. या राज्यस्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धा नाशिकमध्ये होत आहेत.**

# कवठे बुलंद आवाज येथे पोलीस चौकी व्हावी

**कुरुंदवाड :** कुरुंदवाड पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील कवठेगुलंद आणि दत्तवाड येथे स्वतंत्र पोलीस चौकी (औटपोस्ट) सुरू करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष शाहीर आवळे यांनी सपोनि रविराज फडणीस यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की,कुरुंदवाड पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्र हे कर्नाटक राज्याच्या सीमेवर आहे.२७ गावांचा समावेश असून काही काही गावे असंवेदनशील आहेत.याठिकाणीं दारू जुगार मटका गांजा अशा अनेक अवैध व्यवसायाने डोके वर काढले आहे. कर्नाटक राज्याच्या सीमेवरून महाराष्ट्रात कुरुंदवाड पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातून गुटखा-चंदनसह आदी अवैध मालाची तस्करी होते. त्यामुळे शालेय विद्यार्थी व नागरिक व्यासनाच्या आहारी जात असल्याने अनेक कुटुंब उध्वस्त होत आहेत. हे सर्व रोखण्यासाठी दत्तवाड आणि कवठे बुलंद हे दोन मध्यभाग असून या ठिकाणी औटपोस्ट होणे गरजेचे आहे या ठिकाणी दोन औटपोस्ट सुरू करावे असे म्हटले आहे.निवेदनावर दिनेश कांबळे, ,किरण कोळी आदींच्या सह्या आहेत.



**कवठे बुलंद आवाज येथे पोलीस चौकी व्हावी या मागणीचे निवेदन देताना राष्ट्रवादीचे पदाधिकारी.**

# शिव-शाहुंचे पोवाडे आणि महाराष्ट्राच्या पाऊलखुणांतून

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी व परीक्षार्थीसाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सोमवार दिनांक ५ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील महाराणी ताराराणी सभागृहात ’स्पर्धा परीक्षा मोफत मार्गदर्शन सत्र’ आयोजित करण्यात आले आहे.

भारतीय पोलीस सेवेतील परिविक्षाधीन अधिकारी श्री. हर्षवर्धन बी.जे. व महाराष्ट्र लोकसेवा आयोग २०२३, रँक ८९, श्री. ओंकार बजागे हे या सत्रात मार्गदर्शन करणार आहेत. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थी व परीक्षार्थ्यांनी उपस्थित राहून या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

स्पर्धा परीक्षेकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढण्यासाठी तसेच या परीक्षांमध्ये जिल्ह्यातील युवकांचे प्रमाण वाढण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत दर महिन्याच्या पाच तारखेला ’स्पर्धा परीक्षा मोफत मार्गदर्शन शिबिर’ घेण्यात येत आहे. महसूल विभागासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी विद्यार्थ्यांना प्रत्येक विभागातील संधी, त्यासाठी होणाऱ्या परीक्षा, आवश्यक पात्रता, यासाठीची तयारी आदींबाबत मार्गदर्शन करत आहेत.

# औंधला सोमवारी कुस्त्यांचे जंगी मैदान

**औंध :** औंध ता खटाव येथील श्रीयमाईदेवी यात्रेनिमित्त सोमवार दिनांक ५ रोजी कुस्त्यांचे जंगी मैदान होणार आहे. यावेळी प्रथम क्रमांकासाठी उपमहाराष्ट्र केसरी माऊली कोकाटे (पुणे) आणि हरियाणा केसरी विशाल भोंदू यांच्यांत लढत होणार असल्याची माहिती गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

श्रीयमाईदेवी देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामस्थ औंध यांच्या संयुक्त विद्यमाने कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे.मूळपीठ देवीच्या पायथ्याशी असलेल्या भव्य आखाड्यात सोमवारी दुपारी चार पासून नेत्रदीपक लढतीचा थरार रंगणार आहे. मैदानात संदीप मोटे सांगली विरुद्ध सुदर्शन खोतकर, प्रशांत शिंदे (जाखणगाव) विरुद्ध प्रविण सरक (कोल्हापूर),सत्पाल सोनटक्के विरुद्ध सागर तामखडे (कोल्हापूर), प्रशांत जगताप (इचलकरंजी) विरुद्ध समीर शेख (पुणे),कालीचरण सोनवलकर विरुद्ध शशिकांत बोंगार्डे,धीरज पवार (पिंपरी) विरुद्ध वैभव रासकर (कडेगांव)

यांच्यात प्रेक्षणीय लढती होणार आहेत.याशिवाय लहान गटातील चटकदार कुस्त्या देखील मैदानात होणार आहेत लहान गटातील कुस्त्या सोमवारी सकाळी राजवाड्या शेजारील श्रीयमाईदेवी मंदिरात दुपारी बारा वाजेपर्यंत जोडल्या जाणार आहेत.

यावेळी हणमंतराव शिंदे राजेंद्र माने, सदाशिव पवार, किसन आमले, वसंत जानकर,किसन तनपुरे, संतोष भोसले, सदाशिव इंगळे, शहाजी यादव रामभाऊ भोकरे, प्रदीप हजारे, नारायण इंगळे, रसुल शेख उपस्थित होते.

### जमाती प्रवर्गाचा मोदी आवास घरकुल योजनेत समावेश : अतुल सावे

**मुंबई :** राज्यात ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गासोबतच विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांचा समावेश ’मोदी आवास’ घरकुल योजनेमध्ये करण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या २८ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयामधील नमुद अटी व शर्ती विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांनाही लागू राहतील. या योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व पुण्योक अहिल्याबाई होळकर घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# प्रचंड पाणी उपशामुळे राजेवाडी तलाव आटण्याच्या मार्गावर

**देवापूर :** सातारा सांगली सोलापूरच्या सीमारेषेवर स्थित असणाऱ्या ब्रिटिशकालीन राजेवाडी तलाव आटण्याच्या मार्गावर आहे. म्हसवड मध्यम प्रकल्प म्हणून ओळख असणाऱ्या राजेवाडी तलावात आज रोजी अवघा उपयुक्त पाणी साठा १.२४ द.ल.घ.मी अर्थात २.६८% द.ल.घ.मी असून देखील राजेवाडी, हिंगणी, पळसावडे येथील शेतीसाठी अंदाजे ३०० ते ४००विद्युत मोटारीतून पाणी उपसा रात्रंदिवस सुरू असून वन्य प्राणी, मुकी पाळीव जनावरे तसेच मत्स्य बिजांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने विद्युत मोटारीने होत असलेले पाणी उपसा तातडीने थांबावावा यासाठी मा. जिल्हाधिकारी यांनीच लक्ष घालावे अशी मागणी वन्य पशु पक्षी प्रेमिंकडून होत आहे.

राजेवाडी तलावची भिंत ही सोलापूर जिल्ह्यात येत असली तरी पाणी साठवण भाग हा सातारा जिल्ह्यात येतो.



तलावाच्या नजिक पीलिव घाट डोंगर रांग आहे तर पळसावडे नजीक काळा ओढा या दोन्ही परिसरात हरीण, कोल्हे, लांडगे, तरस, सायाळ, अशा विविध वन्य प्राणी तसेच पशु पक्षांचे आश्रय स्थान आहे. मागील आठवड्यात गवा जातीच्या नर मादीचे दर्शन या परिसरात झाले असून. वन्य प्राणी रात्री अपरात्री तलावातील पाणी पिण्यासाठी येत असतात. याठिकाणी पंच क्रोशितील मेंढपाळ, जनावरे पाण्यासाठी, चाऱ्यासाठी येत असतात. एक तर मुक्या जनावांसहित नागरिकांना पिण्याचे पाणी नाही, तलावातील मृत साठा आटला तर काय करायचे? हा यक्ष प्रश्न आ वासून उभा आहे.त्याच बरोबर देवापूर मच्छीमार व्यावसायिक सहकारी सोसायटी अंतर्गत १७५ मच्छीमार व्यावसायिकांच्या तलावातील पाणी उपशामुळे उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांच्या पुढे मत्स्य बीज टिकवणे आवाहन होऊन बसले आहे.

सदरचा तलाव हा १८७६मध्ये ब्रिटिश रानी व्हिक्तोरिया हिने बांधला होता. याची साठवण क्षमता १.६९२टी.एम.सी असून या तलावामुळे ४४हजार २०८एकर क्षेत्राला लाभ होतो. तलाव भरल्यानंतर ४८०चौरस मैल पाणलोट क्षेत्रामध्ये पाणीच पाणी असते. सद्यस्थितीत तलावात १४९३ दक्ष लक्ष घनफूट गाळामुळे पाणीसाठा कमी होऊन सुमारे दहा हजार एकर सिंचन क्षेत्राला फटका बसला आहे.

माननीय जिल्हाधिकारी यांनी तातडीने लक्ष घालण्याची मागणी माण प्रशासनाने मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने विद्युत मोटरीने पाणी उपसा थांबवण्याचे आदेश देऊनही पाणी उपसा सुरूच असल्याचे देवा पूर मच्छीमार सोसायटी ने तालुका प्रशासनास निदर्शनास आणून दिले आहे.

राजेवाडी तलावात पुरेसे पाणी नसल्याने देवापुर मच्छीमार सोसायटी अंतर्गत १७५ मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून तसेच वन्य जीवांना पाणी उपलब्ध होत नसल्याकारणाने उरमोडीचे पाणी सोडण्याची मागणी जोर धरत आहे. मच्छिमार हा व्यवसाय देवापूर मधील शेकडो कुटुंबाचा आधार असताना तलावातील पाणी उपशामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा? हा यक्ष प्रश्न मच्छीमारांसमोर आहे तरी माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून पाणी उपसा थांबावावा अशी मागणी जोर धरत आहे.

# अंत्यविधीसाठी आलेल्या तरुणावर धारदार शास्त्राने हल्ला करून निर्घून खून

### खून करून आरोपी फरार

**नारायणगाव :** जुन्नर आंबेगाव खेड शिरूर यासह पुणे जिल्ह्यातील यात्रा उत्सवामध्ये कुस्त्यांचे फड गाजवणारा पैलवान कैलास उर्फ पिंटू गुलाब पवार (वय-३९, राहणार निमगाव सावा, ता. जुन्नर) या तरुणाचा आज दुपारी मांजरवाडी तालुका जुन्नर येथे धारदार शस्त्राने निर्घृन खून करण्यात आला. त्या नंतर आरोपी फरार झाले आहे.

आरोपींना अटक करण्यासाठी नारायणगाव पोलिसांनी तातडीने कार्यवाही सुरु केली आहे. याबाबत माहिती अशी की, गजराबाई सोनबा साळुंके या महिलेचा अंत्यविधी आज सकाळी ११ वाजता सुमारास मांजरवाडी येथे झाला. अंत्यविधीसाठी कैलास पवार हे नातेवाईकांसह उपस्थित होते.

अंत्यविधी झाल्यानंतर कैलास पवार व नातेवाईक असलेले संशयित तीन ते पाच आरोपी हे मांजरवाडी येथील हॉटेलमध्ये दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास कोरा चहा पिण्यासाठी थांबले होते. येथील रस्त्यालगत असलेल्या मंदिरासमोरील झाडाजवळ संशयित आरोपींनी कैलास पवार याची छाती, पाठ व खांद्यावर धारदार शास्त्राने वार केले. या हल्ल्यात कैलास पवार हे गंभीर जखमी झाले.

उपचारासाठी त्यांना येथील ग्रामीण रुग्णालयात आणले असता उपचारापूर्वीच ते मृत झाले. यावेळी रुग्णालया बाहेर मोठा जनसमुदाय जमला होता. ग्रामीण रुग्णालयात उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी भेट देऊन जमावाला शांत केले. दरम्यान मयत गुलाब पवार यांच्या नातेवाईकांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला असून नेमके त्यांनी काय म्हटले आहे याबाबतचा प्रत्यक्ष आढावा घेतला आहे आपला आवाज न्यूज नेटवर्क चे कार्यकारी संपादक किरण वाजगे यांनी पाहुयात

# पुण्याच्या धरणातून उजनीला पाणी देता येणार नाही : अजित पवार

**सोलापूर :** यंदा उजनी धरण मायनस मध्ये गेली आहे. फेब्रुवारी नंतर सोलापुरात पाण्याची भीषण टंचाई निर्माण होणार आहे. वेळ पडल्यास पुण्याच्या धरणातून उजनीत पाणी सोडणार का असे पत्रकारांनी अजित पवार यांना विचारले असता त्यांनी अप्रत्यक्षरीत्या पाणी देण्यास नकार दिला.



ते म्हणाले, पुणे व आसपास परिसरातील लोकसंख्या लक्षात घेता पुणे परिसरतील धरणातून उजनीत पाणी सोडणे वास्तवात शक्य नाही .उजनी धरणातील पाण्याचे नियोजन चुकल्याचे सांगत यास कालवा सल्लागार समिती जबाबदार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. अजित पवार हे सोलापूर दौऱ्यावर असून दरम्यान त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना उजनीच्या स्थितीबद्दल माहिती दिली.